दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–३२१ रविवार, १६ मार्च २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

भारतीयांच्या शिरपेचात मानाचा तुरा

भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात इस्रोने मागच्या दहा वर्षांत विदेशी सॅटेलाईट लॉन्च करून तब्बल १४३ मिलियन अमेरिकन डॉलर परदेशी चलन मिळविल्याची केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत दिलेली माहिती देशाच्या दृष्टीने अभिमानास्पदच ठरावी. पीएसएलव्ही, एलव्हीएम३, एसएसएलव्ही रॉकेटच्या माध्यमातून भारताने आत्तापर्यंत ३४ देशांचे सॅटेलाईट लॉन्च केले आहेत. यामध्ये सर्वाधिक म्हणजे २३२ इतके सॅटेलाईट हे एकट्या अमेरिकेचे आहेत. तर इंग्लंडचे ८३, सिंगापूरचे १९, पॅनडाचे ८, दक्षिण कोरियाचे ५, लक्समबर्ग आणि इटलीचे प्रत्येकी ४, जर्मनी, फ्रान्स, बेल्जिअम आणि फिनलंडच्या प्रत्येकी ३ सॅटेलाईटचा समावेश असल्याचे दिसून येते.

सोने सर्वाधीक उंच्चांकावर; गाठला ९० हजारांचा टप्पा !

मुंबईः सोने-चांदी हे मौल्यवान धातू स्वस्त होतील, ही ग्राहकांची अपेक्षा आता फोल ठरताना दिसून येत आहे. सोने दराने सर्वकालीन उच्चांक गाठला असून, सोने प्रतितोळा ९० हजारांच्या पार गेले आहे. अवघ्या दोनच महिन्यांत सोने तब्बल १० हजारांनी वधारले असून, दरवाढीची गती बघता दसरा, दिवाळीअगोदरच सोने लाखाचा टप्पा गाठण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गतवर्षी केंद्र सरकारने सोन्याच्या आयात शुल्कात लक्षणीय ९ टक्के कपात केल्याने, आयात शुल्क १५ वरून ६ टक्क्यांवर आले होते. त्यामुळे सोने दर घटून ७५ हजारांवरून थेट ७० हजारांपेक्षा कमी प्रतितोळ्यावर आले होते. त्यामुळे सोन्याच्या दरांमध्ये फारशी वाढ न होता, दर आणखी कमी होतील, अशी अपेक्षा ग्राहकांना होती.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्राने शेतीचा कायापालट

खा.शरद पवार यांनी वर्तविला उसासह शेती क्षेत्राचा अंदाज

बारामती । प्रतिनिधी

ऊस पिकात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला तर हे तंत्रज्ञान इतर पिकांमध्ये येईल. त्यातून शेती क्षेत्राचा कायापालट होईल, असा विश्वास खासदार शरद पवार यांनी शनिवारी (दि.१५) व्यक्त केला. बारामती येथील उसाच्या शाश्वततेसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता या परिसंवादात पवार बोलत होते. यावेळी विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे, सकाळ समूहाचे प्रतापराव पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि राजेंद्र पवार व्यासपीठावर उपस्थित होते.

पवार म्हणाले, ''कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर साखर उद्योगात सुरू झाला आहे. ऊस उत्पादकांसमोर लागवडीचा कालावधी, योग्य वाणांची निवड, जमिनीचे बिघडते आरोग्य, खत-औषधांचा वापर, पाण्याचा वापर, कीड रोगांचा प्रादुर्भाव, साखरेचा उतारा कमी होणे, हार्वेस्टरच्या वेळी येणाऱ्या अडचणी आणि त्यामुळे वाढता उत्पादन खर्च वाढत आहे. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही'' असे प्रतिपादन पवारांनी केले. विस्माचे अध्यक्ष ठोंबरे यांनी राज्यातील साखर उद्योगाच्या समस्यासह ऊस उत्पादकता वाढीकडे लक्ष वेधले. राज्यातील ऊस उत्पादनाकडे गांभीर्याने पाहावे. बेण्याची फेरपालट करणे, ठिबकचा वापर आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या त्रिसूत्रीमधून महाराष्ट्र येत्या पाच वर्षात ◀◀ पान २ वर

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर चिंता

यावेळी शरद पवार यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्यावरही चिंता व्यक्त केली. पवार म्हणाले, शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी झाल्या होत्या. आता पुन्हा आत्महत्या वाढू लागल्या आहेत. यामध्ये सर्व संस्थांसह केंद्र-राज्य सरकारला लक्ष घालावे लागेल, असेही पवार म्हणाले. तसेच ऊस उत्पादकांच्या समस्यांकडे पवारांनी लक्ष वेधले.

संस्थाचालकाच्या जाचाला कंटाळून शिक्षकाची आत्महत्या



बीड । प्रतिनिधी

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर आता बीडमधून आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका शिक्षकानं भावनिक पोस्ट लिहून आपल्या आयुष्य संपवलं. शिक्षकानं बीड शहरातील कृष्णा अर्बन बॅंकेच्या दारातच एसीच्या ग्रीलला गळफास घेऊन जीवन संपवल्याने मोठी खळबळ उडाली आहे. फेसबूक पोस्ट करत धनंजय अभिमान नागरगोजे नावाच्या शिक्षकाने आत्महत्या केली आहे. आपल्या मुलीला उद्देशून लिहिलेल्या या पोस्टमध्ये त्यांनी आत्महत्येचं कारण सांगितलं अन् भावनिक पोस्ट लिहिली आहे.

धनंजय अभिमान नागरगोजे मागील १८ वर्षांपासून विना अनुदानित आश्रमशाळेत शिक्षक म्हणून काम करत होते. १८ वर्षांपासून काम करत असूनही वेतन मिळत नसल्याचा आरोप केला आहे. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी शाळेच्या संचालकांवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या छळाला ◀◀ पान २ वर

सतीश भोसलेचे घर पाडण्यासाठी अति घाई केली

आ.सुरेश धस जिल्हाधिकाऱ्यांना जाब विचारणार

बीड । पतिनिधी

खोक्या उर्फ सतीश भोसलेच्या शिरूर कासार गावात असलेल्या घरावर बुलडोझर फिरवण्यात आल्यानंतर वन विभागाच्या जागेवर हे अनधिकृत घर बांधण्यात आल्याचा समोर आले. आता सतीश भोसलेचे घर पाडण्यासाठी अतिघाई का केली? असा जाब भाजप आमदार सुरेश धस वनविभागाला आणि कलेक्टर यांना विचारणार असल्याचे त्यांनी सांगितले.

खोक्या उर्फ सतीश भोसले हा सुरेश ◀◀ पान २ वर

खोक्याला बावी गावात आणले; घटनास्थळावर कसून चौकशी सुरू

खोक्या उर्फ सतीश भोसले याने हरणांची शिकार केल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यामुळे आता पोलिस शनिवारी खोक्याला घेऊन घटनास्थळी दाखल झाले आहेत. शिरूर कासार तालुक्यातील बावी गावात खोक्याला आणण्यात आले आहे. तिथे त्याची कसून चौकशी आणि तपास केला जात आहे. ढाकणे पिता पुत्राला मारहाण ज्या ठिकाणी मारहाण केली त्या ठिकाणी खोक्याला नेऊन पोलिसांनी चौकशी केली. खोक्याला अटक केल्यानंतर त्याला न्यायालयाने ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

आमसभेत मारेकऱ्यांना कठोर शासनाचा ठराव मंजूर

आष्टी मध्ये भाजप आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतून आम सभेचे आयोजन करण्यात आले होते. या आमसभेतून सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना कठोर शासन व्हावे याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

बीडचा गांजा तस्कर कल्याणमध्ये सापडला

सापळा रचून रंगेहात अटक; अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

येथील गांजा तस्कराला कल्याणमध्ये अटक झाली आहे. कल्याण पोलिसांनी ही धडक कारवाई केली. पोलिसांनी सापळा रचून आरोपीला रंगे हात पकडले. आरोपी कल्याणमध्ये कुणाला गांजा देणार होता याचा पोलिस शोध घेत आहेत. आरोपीकडून लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

कल्याण आणि आजूबाजूच्या परिसरात गांजाची तस्करी करणाऱ्या एका गांजा तस्कराला कल्याणच्या बाजारपेठ पोलिसांनी अटक केली आहे. शकील शेख या गांजा तस्कराचे नाव आहे. तो मूळचा बीड जिल्ह्यातील राहणारा आहे. बीडमधून १२ किलो गांजा घेऊन कल्याणला आला असल्याची माहिती एका खबऱ्याने पोलिसांनी दिली होती. कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी चौकाजवळ पोलिसांनी सापळा रचून शकीलला गांजासह पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी शकील हा गांजा कोणाला देणार होता ? शकील हा बीडचा असल्याने त्याच्या विरोधात ◀◀ पान २ वर

धनंजय मुंडेंची आमदारकी १०० टक्के जाणारच

करुणा शर्मा यांचा दावा; शपथपत्रात खोटी माहिती दिल्याचा आरोप

बीड । पतिनिधी

मंत्रिपदानंतर आता धनंजय मुंडे यांची आमदारकी देखील जाणार असल्याचा दावा करुणा शर्मा यांनी केला आहे. येत्या ६ महिन्यात धनंजय मुंडे यांची आमदारकी जाणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. परळीच्या कोर्टात शनिवारी धनंजय मुंडे यांच्या विरोधात सुनावणी होती. करुणा शर्मा यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात विधानसभेत शपथ पत्रात खोटी माहिती दिल्याची तक्रार दाखल केलेली आहे.

यावेळी बोलताना करुणा शर्मा म्हणाल्या की, धनंजय मुंडे हे मंत्रिपदाचा राजीनामा देतील असे मी म्हणाले होते. ◀◀ पान २ वर

बीड, अमरावतीत होत असलेल्या घटन चिंताजनक – शरद पवार

बारामती । प्रतिनिधी

मागील काही महिन्यापासून धनंजय मुंडे आणि त्यांचे विश्वासू सहकारी वाल्मिक कराड यांच्या सत्तेच्या गैरवापर करत हैदोसाच्या अनेक सुरस कथा बाहेर येत आहेत. तसेच अमरावती जिल्ह्यातूनही अशाच पद्धतीच्या घटनांची माहिती पुढे येत आहे. यापार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी चिंता व्यक्त केली.

बारामतीत आयोजित एका कार्यक्रमानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार हे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्हे, बीड, अमरावती बाबतची जी माहिती मिळते ती चिंताजनक आहे. आम्ही थोडी फार माहिती काढली. ठिकठिकाणची माहिती एकत्र करत आहोत. केंद्र सरकारने त्याबाबत धोरण आखावे. त्यांनी मदत करण्यासाठी ◀◀ पान २ वर

औरंगजेबची कबर नष्ट करण्याचा इशारा

मिलिंद एकबोटेंना जिल्हाबंदी, मोठा बंदोबस्त तैनात

संभाजीनगर । प्रतिनिधी

औरंगजेब कबर नष्ट करण्याचा इशारा देणारे धर्मवीर संभाजी महाराज प्रतिष्ठाणचे अध्यक्ष मिलिंद रमाकांत एकबोटे यांना जिल्हाबंदी करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरचे अप्पर जिल्हाधिकारी विनोद खिराळकर यांनी याबाबत जिल्हाबंदीचे आदेश काढले आहेत. मिलिंद एकबोटे आणि त्यांच्या समर्थकांना १६ मार्च २०२५ ते ५ एप्रिल २०२५ पर्यंत संभाजीनगरमध्ये जिल्हाबंदी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने मिलिंद एकबोटे औरंगजेबची कबर नष्ट करण्यासाठी येणार असल्याची गोपनीय माहिती प्रशासनाला मिळाली होती.

विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने औरंगजेबाची कबर महाराष्ट्रातून हलवली नाही तर बाबरीची पुनरावृत्ती करु, असा इशारा दिला आहे. त्यानंतर राज्यातील वातावरण चांगलच गरम झाल्याचे पाहायला मिळत आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.

याबाबत मिलींद एकबोटे म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरला जाण्याचे माझे कोणतही प्रयोजन नाही, असे असतानाही मला जिल्हाबंदीची नोटीस देण्यात आली आहे. विधानसभेत गेल्या काही दिवसांपासून औरंगजेबाच्या कबरीवरून राजकारण तापले आहे. ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: २७२.०० क्विंटल		
किमान	कमाल	सरासरी
२,५००	२,८००	२,६१०
ज्वारी/हायब्रिड: १८०.५० क्विंटल		
१,७००	३,७५०	२,२६५
मका/लोकल:२०.०० क्विंटल		
२,१५०	२,१५०	२,१५०
तूर : ३.५० क्विंटल		
६,०००	६,०००	६,०००
उडीद : ७.५० क्विंटल		
५,१००	५,१००	५,१००
बाजरी: ९४.०० क्विंटल		
२,०००	३,०९०	२,५३४
मुग :४.५० क्विंटल		
६,५०१	७,४५१	६,९७६
सोयाबीन: ४३.५० क्विंटल		
३,६३०	३,९८०	३,८६२
हरभरा: ५.५० क्विंटल		
४,९३०	५,१०१	५,०१०

आता घरकुलासाठी मिळणार मोफत वाळू; राज्य सरकारचा मोठा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात घरकुल बांधणाऱ्या नागरिकांसाठी आनंदाची बातमी आहे. घरकुल बांधणाऱ्या लाखो लोकांना राज्य सरकारने पाच ब्रास मोफत वाळू देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाचा फायदा घरकुल बांधत असलेल्या लाखो लोकांना होण्याची शक्यता आहे.

याबाबत बोलताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, ज्या ठिकाणी लिलाव झालेले नाहीत. ज्या ठिकाणी आम्हाला एन्व्हायरमेंट क्लियरन्स मिळाला आहे. त्या ठिकाणी वाळू घाटांचे लिलाव होतील. तसेच घरकुलांना पाच ब्रास ◀◀ पान २ वर

सोयापेंड निर्यातीसाठी अनुदान द्या

मुख्यमंत्री फडणवीस यांचे गृहमंत्री अमित शहा यांना पत्र

मुंबई । प्रतिनिधी

सोयाबीन भाव वाढीसाठी सरकारने सोयापेंड निर्यातीसाठी अनुदान द्यावे, अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री तसेच सहकारमंत्री अमित शहा यांच्याकडे केली आहे. राज्याच्या कृषीमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनीही ही मागणी करत सरकारने ५ हजार कोटी निर्यात अनुदान दिल्यास सोयाबीनचा भाव ५५०० रुपयांपर्यंत वाढतील, असा दावा केला.

देशात वाढलेले सोयाबीन उत्पादन, डीडीजीएसचा पुरवठा, आंतरराष्ट्रीय बाजारातील मंदी या कारणामुळे सोयाबीनचे भाव यंदा वाढणार नाहीत हे स्पष्टच होते. देशातील बाजारात सोयाबीनचा भाव हंगामाच्या सुरुवातीपासूनच कमी आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील परिस्थिती पाहता देशात भाव कमीच राहतील आणि सरकारने सोयापेंड निर्यातीला अनुदान द्यावे, अशी मागणी

सुरुवातीपासूनच केली जात होती. बाजारात शेतकऱ्यांच्या सोयाबीनची आवक मोठ्या प्रमाणात सुरु होती. त्यावेळी सरकारच्या खेरदीचाही आधार बाजाराला मिळाला नाही. त्यामुळे सरकारने सोयापेंड निर्यातीला अनुदान देण्याची मागणी केली जात होती. शेतकऱ्यांचे सोयाबीन मोठ्या प्रमाणात बाजारात येत असताना भाववाढीसाठीचे प्रयत्न म्हणून केवळ खेरदी केली. सरकारच्या खरेदीनेही भाव वाढले नाहीत. त्यावेळी मात्र मुख्यमंत्र्यांनी केंद्राकडे सोयापेंड निर्यातीला अनुदान देण्याची मागणी केली नाही. आता मुख्यमंत्री केंद्राकडे अशी मागणी करत ◀◀ पान २ वर

सावधान ! उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट

पुणे । पतिनिधी

राज्यातील बहुतांश भागात वाढत्या उष्म्याने लोक हैराण झाले आहेत. दरम्यान, विदर्भातील काही जिल्ह्यांत उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. चंद्रपूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांत १६ मार्च रोजी उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट दिला आहे. विशेषतः चंद्रपूर यवतमाळमध्ये पुढील दोन दिवस उष्णतेच्या लाटेची तीव्रता कायम राहील, असे हवामान विभागाने म्हटले आहे.

विदर्भातील ब्रम्हपुरी, चंद्रपूर आणि वर्धा येथील कमाल तापमान शनिवारी ४१ अंश सेल्सियसवर पोहोचले. अकोला, अमरावती, नागपूर, यवतमाळ येथील तापमानाचा पारा ४० अंशांवर राहिला. दरम्यान, १५ ते १८ मार्चदरम्यान ओडिशा, १५ ते १७ मार्च दरम्यान सौराष्ट, कच्छ, १५ ते १६ मार्चदरम्यान झारखंड, पश्चिम बंगालचे गंगा क्षेत्र, छत्तीसगड, विदर्भ, उत्तर तेलंगणा आणि १८ ते १९ मार्चरम्यान उत्तर कर्नाटकच्या अंतर्गत भागात उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे. तसेच पुढील ४ ते ५ दिवसांत ईशान्य भारतातील काही ठिकाणी मुसळधार पाऊस अथवा बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे.

बचावासाठी अशी घ्या काळजी

अधिकवेळ उष्ण वातावरणात राहणे टाळावे. पुरेसे पाणी प्या. हलक्या वजनाचे सैल, सुती कपडे घाला. उन्हापासून त्रास होऊ नये म्हणून डोक्यावर ओले कापड, टोपी आणि छत्रीचा वापर करा.

अग्रलेख

भारतीयांच्या शिरपेचात मानाचा तुरा

भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात इस्रोने मागच्या दहा वर्षांत विदेशी सॅटेलाईट लॉन्च करून तब्बल १४३ मिलियन अमेरिकन डॉलर परदेशी चलन मिळविल्याची केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत दिलेली माहिती देशाच्या दृष्टीने अभिमानास्पदच ठरावी. पीएसएलव्ही, एलव्हीएम३, एसएसएलव्ही रॉकेटच्या माध्यमातून भारताने आत्तापर्यंत ३४ देशांचे सॅटेलाईट लॉन्च केले आहेत. यामध्ये सर्वाधिक म्हणजे २३२ इतके सॅटेलाईट हे एकट्या अमेरिकेचे आहेत. तर इंग्लंडचे ८३, सिंगापूरचे १९, पॅनडाचे ८, दक्षिण कोरियाचे ५, लक्समबर्ग आणि इटलीचे प्रत्येकी ४, जर्मनी, फ्रान्स, बेल्जिअम आणि फिनलंडच्या प्रत्येकी ३ सॅटेलाईटचा समावेश असल्याचे दिसून येते. याशिवाय भारताकडून जपान, इस्रायल, स्पेन, ऑस्ट्रेलिया, संयुक्त अरब अमिराती आणि ऑस्ट्रिया यांसारख्या देशांची सॅटेलाईटही लॉन्च करण्यात आली आहेत.

भारतासारखा देश अंतराळ क्षेत्रात नवी झेप घेतो आणि केवळ जानेवारी २०१५ ते २०२४ या कालावधीत १२ अब्ज भारतीय ऊपयांपेक्षाही अधिक विदेशी चलन त्यातून प्राप्त करतो, ही क्रांतिकारकच घटना म्हणता येईल. वास्तविक मागच्या काही वर्षांतील इस्रोचा प्रवास थक्क करणाराच आहे. १९६२ मध्ये मुहूर्तमेढ रोवल्या गेलेल्या इस्रोने प्रत्येक टप्प्यागणिक एकेक शिखरे पादाक्रांत केली आहेत. इस्रोने ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण यान अर्थात पीएसएलव्ही १९९० मध्ये विकसित केल्याचे सांगण्यात येते. १९९३ साली त्याच्या मदतीने पहिला उपग्रह अवकाशात झेपावला. इस्रोसाठी ही फार महत्त्वपूर्ण बाब ठरते. यापूर्वी अशी प्रणाली केवळ रशियाकडे होती. रशियानंतर भारतानेदेखील ही प्रणाली विकसित करून अंतराळ क्षेत्रातील आपले स्थान मजबूत केल्याचेच यातून अधोरेखित होते. १५ फेब्रुवारी हा दिवस तर इस्रोच्या इतिहासातील सुवर्णक्षणच म्हणता येईल. याच दिवशी श्री हरिकोटा येथील सतीश धवन अवकाश केंद्रातून पीएसएलव्ही सी ३७ या यानाने एक, दोन नव्हे, तर तब्बल १०४ उपग्रहांचे प्रक्षेपण केले. तत्पूर्वी रशियाने ३, तर अमेरिकेने एका वेळी २९ उपग्रहांचे अवकाशात प्रक्षेपण केल्याचा इतिहास सांगितला जातो. यातील आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे १०४ पेकी केवळ तीनच उपग्रह भारताचे, तर उर्वरित १०१ उपग्रह इतर देशांचे असल्याचे दिसून येते. २००६ ची चांद्रयान मोहीम भारतीयांच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारी ठरते. भारताच्या चांद्रयानाने अवकाशात घेतलेली भरारी व चंद्रावर चितारलेला तिरंगा, हा समस्त भारतीयांसाठी अविस्मरणीयच प्रसंग होय. त्यानंतरच्या मोहिमेत अडथळे आले असले, तरी कोणत्याही मोहिमेतील चढउतार हे काहीतरी नवे शिकवत असतात. इस्रो व इस्रोच्या शास्त्रज्ञानांनीही कठीण प्रसंगातून वेगळे काहीतरी शिकण्याचा आपला दृष्टीकोन कायम ठेवल्याने त्यांचे पाऊल पुढे पडत आहे. मंगळयान हीदेखील एक महत्त्वाकांक्षी मोहीम. पहिल्याच प्रयत्नात ही मोहीम यशस्वी होते, यावरूनच तिचे महत्त्व लक्षात यावे. खरे तर अमेरिका, रशियासारख्या पुढारलेल्या देशांनाही पहिल्या प्रयत्नात मंगळावर स्वारी करण्यात यश आले नव्हते. इस्रोने ही मजल मारावी, यातूनच या अवकाश संस्थेचा आवाका आणि मेहनत अधोरेखित होते.

भविष्यात इस्रोकडून अनेक नव्या मोहिमांची आखणी करण्यात आली आहे. त्यात गगनयानसारखी मोहीम यशस्वी झाली, तर भारताचा चंद्र आणि मंगळावर माणूस पाठविण्याचा मार्ग खुला होणार आहे. याशिवाय सूर्याचा वेध घेण्यासाठी आदित्यसारखी योजनादेखील एक क्रांतिकारी पाऊल होय. स्पेडेक्स मिशनदेखील कुतूहल वाटावे असेच. यामार्फत अंतराळात दोन लहान अंतराळयानांच्या डॉकिंगचे प्रात्यक्षिक करण्यात येणार आहे. हे तंत्रज्ञान भविष्यातील चंद्र मोहिमांसाठी, भारतीय अंतरिक्ष स्टेशन बांधण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरू शकते. यातून स्पेस डॉकिंग क्षमता असलेल्या राष्ट्रांच्या एलिट क्लबमध्ये भारत सामील होण्याचा मार्ग मोकळा होऊ शकेल.

इस्रोच्या शास्त्रज्ञांनी आपल्या कष्ट आणि जिद्दीच्या बळावर आजवर अनेक मोहिमा तडीस नेल्या. आगामी काळात भारतीय अवकाश संशोधन क्षेत्राला आणखी नव्या उंचीवर नेण्याच्या दृष्टीने इस्रोने विविध मोहिमांची पायाभरणी करून ठेवली आहे. देशाच्या गरजा ओळखून अवकाश संशोधनाचा फायदा देशातील सामान्यातील सामान्य माणसाला करून देणे, हे इस्रोचे ध्येय राहिले आहे. मुख्य म्हणजे कोणताही गाजावाजा न करता शांतपणे इस्रोकडून अवकाश संशोधनावर काम सुरू होते. उाणांच्या खर्चाचा विचार केला, तर त्या स्तरावरही इस्रोची कामगिरी चमकदार ठरते. ज्या ठिकाणी अमेरिकी संस्था नासाचा खर्च सहा ते साडेसहा हजार कोटी ऊपये इतका येतो, तेथे इस्रोच्या उड्डाणाचा खर्च फक्त १०० कोटी ऊपये इतका येत असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर दस्तुरखुद्द अमेरिका व अन्य देशांतील कंपन्या भारताकडे आपले उपग्रह प्रक्षेपित करण्यासाठी पाठवू लागले आहेत. त्यामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील बाजारपेठाही इस्रोकरिता उपलब्ध होत आहेत. याचा अमरिकेसारख्या देशाला मोठा फटका बसत असून, अवकाश संशोधन क्षेत्रात भारत एक महासत्ता म्हणून उदयास येत असल्याचे दिसत आहे. ही समस्त भारतीयांसाठी नक्कीच अभिमानास्पद बाब म्हणता येईल.

द लाइफ नेव्हिगेटर : विद्यार्थी – पालक अन् शिक्षकांसाठी मानसिक मदतीचे सहाय्य

सायफीस्किल्स एज्युवर्हर्स यांच्याकडील उपक्रम हे प्रशिक्षण, गणित, विज्ञान, बुद्धिमत्ता आणि व्याकरण कौशल्य वाढवणारे कार्यक्रम आहेत. संयमित मोबाईल वापरास प्रोत्साहन, शिक्षण आणि उत्पादकतेसाठी योग्य मोबाईल वापर करण्यास मार्गदर्शन यातून मिळते.

द लाइफ नेव्हिगेटर: मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी :

द लाइफ नेव्हिगेटर विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि पालकांच्या मानसिक व भावनिक आरोग्यासाठी मदत करणार आहे: मोबाईल व्यसनमुक्ती विद्यार्थ्यांना स्क्रीन वेळ नियंत्रित करण्यासाठी ते मदत करते. तणाव आणि दडपण व्यवस्थापन, शैक्षणिक दडपण हाताळण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शन व कार्यशाळा. वर्तणूक व भावनिक मदत मानसिक आरोग्यासाठी संसाधने, तज्ज्ञ सल्लामसलत व स्पर्धा. पालकांसाठी मदत आत्मविश्वास व मानसिक स्थिरता वाढवण्यासाठी पालकांसाठी विशेष मार्गदर्शन. शिक्षकांचे मानसिक आरोग्य तणाव व्यवस्थापन तंत्राद्वारे उत्पादकता आणि सहभाग वाढवणे. सर्व संसाधने लेख, तज्ज्ञ सल्ला, संवादात्मक स्पर्धा आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून उपलब्ध असतील. सायफीस्किल्स एज्युवर्हर्स प्रा. लि. विद्यार्थ्यांना २१ व्या शतकातील शिक्षण पद्धतींनी प्रशिक्षित करते आणि गणित, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या विषयांमध्ये कौशल्य वाढवते. गणित आणि विज्ञानाचे प्रगत प्रशिक्षण, समस्या सोडवण्याची क्षमता वाढवते.

बुद्धिमत्ता आणि तर्कशक्ती विकास :

ऑलिम्पियाड, आणि परीक्षेसाठी तयारी. व्याकरण आणि भाषा कौशल्य, इंग्रजीत प्रावीण्य वाढवून जागतिक संप्रेषण कौशल्य वाढवणे. प्रशिक्षणानंतर प्रमाणपत्र आणि ऑलिम्पियाड स्पर्धा. स्पर्धात्मक परीक्षांसाठी तयारी आणि शैक्षणिक मान्यता मिळवणे. हा उपक्रम विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान देऊन त्यांना परीक्षांसाठी आणि भविष्यातील आव्हानांसाठी तयार करेल. हा सहकार्य उपक्रम शिक्षण क्षेत्रात परिवर्तन घडवणार असून, विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य आणि कौशल्य प्रशिक्षण यातून मिळेल. शिक्षण आणि मानसिक आरोग्याचा समतोल दृष्टिकोन, शैक्षणिक गुणवत्ता आणि मानसिक आरोग्याचा यात समावेश आहे. विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करणे तयारी आणि मानसिक स्थिरता. पालक आणि शाळेतील सहकार्य मजबूत करणे, मुलांच्या शिक्षणात पालकांचा सक्रिय सहभाग. जबाबदारीने डिजिटल सवयी विकसित करणे, शैक्षणिक उद्देशांसाठी मोबाईलचा योग्य वापर. सकारात्मक शिक्षण वातावरण तयार करणे विद्यार्थ्यांसाठी, पालकांसाठी आणि शिक्षकांसाठी समृद्ध वातावरण निर्माण करणे. या माध्यमातून विद्यार्थ्यांची सर्वांगिण प्रगती साधता येणार आहे.

:::संचालक:::
डॉ.सोहेल राणा, बीड

महिला लोकशाही दिनाचे आयोजन

जालना । प्रतिनिधी

महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. तालुकास्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याचे चौथ्या सोमवार आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिस–या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यासाठी दि. १७ मार्च रोजी सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणा–या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतित महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय जालना येथे दाखल करण्याचे आवाहन केले आहे.

अर्ज स्वीकृतीचे निकष पुढीलप्रमाणे तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, तक्रार निवेदन दोन प्रतित सादर करावे, सदरील प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, अर्ज विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा, सेवा व आस्थापना विषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. निवडणुक आचार संहिता काळात त्या त्या स्तरावर, विधीमंडळ अधिवेशन काळात राज्यस्तर महिला लोकशाही दिन पाळण्यात येत नाही. महिलांनी प्रथम संबंधीत तहसिलदार यांच्याकडे महिला लोकशाही दिनाच्या पंधरा दिवस आधी दोन प्रतीत तक्रार दाखल करावी. तालुका महिला लोकशाही दिनात एका महिन्यांचे आत कार्यवाही न झाल्यास संबंधीत महिला जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनांत तक्रार दाखल करु शकतील. तालुकास्तरावरील लोकशाही दिनांत अर्जदार महिलेस अंतिम उत्तर शक्य तितक्या लकर जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत देण्याचे बंधन संबंधित अध्यक्ष तथा तहसिलदार व सदस्य सचिव तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची राहील.

अंबाजोगाईत प्लास्टिक संकलन स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ

ज्ञान प्रबोधिनी निवेदिता गट आणि नगरपालिका अंबाजोगाई यांचा संयुक्त उपक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

ज्ञान प्रबोधिनी निवेदिता गट आणि नगरपालिका अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने प्लास्टिक संकलन स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. हा समारंभ योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या नागापूरकर सभागृहामध्ये पार पडला.

या स्पर्धेअंतर्गत प्रत्येक महिन्याच्या २० तारखेला घरातील प्लास्टिक स्वच्छ करून आणि कोरडे करून निवेदिता गटाकडे जमा करायचे होते. हा उपक्रम २० नोव्हेंबर २०२३ ते २० ऑक्टोबर २०२४ या कालावधीत राबवण्यात आला. सातत्याने, स्वच्छ आणि मोठ्या प्रमाणात प्लास्टिक संकलन करणाऱ्या गृहिणींना गौरविण्यात आले. जमा झालेले संपूर्ण प्लास्टिक रिसायकलिंगसाठी पाठवण्यात आले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई नगरपालिकेच्या मुख्याधिकारी मा. प्रियंका टोंगे होत्या. स्वच्छता निरीक्षक मा. अनंत वेडे, समाजसेवक नंदकिशोरजी मुंदडा, माजी नगरसेविका सविताताई लोमटे व संगीता ताई व्यवहारे हे मान्यवर उपस्थित होते. ज्ञान प्रबोधिनीचे प्रमुख व मार्गदर्शक प्रसाद दादा चिक्षे यांनी या गटाच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी समाजसेवक नंदकिशोरजी मुंदडा यांनी या संकलित प्लास्टिकला सध्या लातूर येथे पाठवावे लागते, मात्र भविष्यात असे रिसायकलिंग युनिट अंबाजोगाईत सुरू करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. यावर मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांनी अशा युनिटसाठी आवश्यक बाबी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. तसेच उपस्थित महिलांना आपापल्या घरातील कचरा ओला व सुका वेगळा करून घंटागाडीत टाकण्याचे आवाहन केले. प्लास्टिक संकलन बक्षीस वितरण समारंभात विजेत्यांची नावे जाहीर करण्यात आली. अमृता चिक्षे यांनी प्रथम, जयश्री दहिफळे यांनी द्वितीय आणि सविता कराड यांनी तृतीय क्रमांक पटकावला. तसेच प्रभाग ६ मधील सौ. अंजना शिंदे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. प्रभाग ६ व्यतिरिक्त पार्वती धाकतोंडे, मुक्ता बागवाले आणि तोंडारे सर यांना देखील उत्तेजनार्थ पुरस्काराने गौरवण्यात आले. याशिवाय, ९४ महिलांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. गेल्या वर्षभरात या गटाने एकूण ३५०० किलो प्लास्टिक संकलित करून ते लातूर येथील रिसायकलिंग युनिटकडे पाठवले आहे. हा उपक्रम फक्त स्पर्धेपूरता मर्यादित न ठेवता अविरत सुरू ठेवण्याचा निर्धार या गटाने व्यक्त केला. अंबाजोगाईतील शाळांमध्येही प्लास्टिक संकलन स्पर्धा घेतली जात असून त्यास मोठा प्रतिसाद मिळत आहे. या समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सारिका बुरगे आणि मनीषा वालेकर यांनी केले. आभार प्रदर्शन तिलोत्तमा पतकराव यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. शुभदा लोहिया, डॉ. सीमा लोमटे, डॉ. नयन लोमटे, डॉ. प्रिया मुळे, स्मिता जोशी, रूपाली मुकादम, संगीता कराड, डॉ. कल्पना मुळावकर, डॉ. गौरी कुलकर्णी यांच्यासह प्रभाग ६ मधील आणि इतर ठिकाणच्या अनेक महिलांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत गुरुदेवचा विश्वदीप खोडसे सर्व द्वितीय

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सन १९५८ साली स्थापन झालेल्या बनेश्वर शिक्षण संस्था बनसारोळा या संस्थेने आजपर्यंत विद्यापीठाचे कुलगुरू उच्च न्यायालयाचे न्यायाधीश पोलीस उपायुक्त पोलीस अधीक्षक जिल्हाधिकारी उपजिल्हाधिकारी कवी लेखक कलावंत यासोबतच अनेक नामवंत खेळाडू ही महाराष्ट्राला दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असणाऱ्या बनेश्वर शिक्षण संस्था बनसारोळा संचलित गुरुदेव विद्यालय मोरेवाडी या शाळेतील इयत्ता आठवीच्या वर्गातील विद्यार्थी विश्वदीप गोडसे यांने राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावून शाळेचा नावलौकिक वाढवला आहे. श्री विठ्ठलराव जोशी चारिटी ट्रस्ट स्पोर्ट अकादमी कासारवाडी चिपळूण यांच्यावतीने आयोजित राज्यस्तरीय डेरवण युथ २५ या धनुर्विद्या स्पर्धेत बनेश्वर शिक्षण संस्था संचलित गुरुदेव विद्यालय मोरेवाडी चा इयत्ता आठवीच्या वर्गातील विद्यार्थी चिरंजीव विश्वदीप रत्नेश्वर खोडसे याने सर्व द्वितीय क्रमांक मिळवून यश संपादन केले आहे. या नामांकित स्पर्धेमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील खेळाडू सहभागी झाले होते. धनुर्विद्येतील अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या डेरवण युथ २५ या स्पर्धेमध्ये विश्वदीपने संपादन केलेले यश उल्लेखनीय आहे. यापूर्वीही विश्वदीपने अनेक स्पर्धेमध्ये विविध पारितोषिके पटकावलेली आहेत. अत्यंत लहान वयापासूनच विश्वदीपला धनुर्विद्या शिकण्याची उत्कंठा होती त्यानुसार त्याच्या पालकांनी व शाळेने त्याच्या योग्य प्रशिक्षणाची सोय केली आणि आज विश्वदीप अत्यंत लहान वयात उत्कृष्ट धनुर्धारी म्हणून ओळखला जातोय. अकादमीचे क्रीडा संचालक श्रीकांत पारडकर व ट्रस्टी विकास वालावलकर यांच्या हस्ते विश्वदीतचा ट्रॉफी रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. विश्वदीपच्या यशाबद्दल बनेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भागवत दादा गोरे सचिव डॉ.नरेंद्र काळे सर्व संचालक मंडळ मुख्याध्यापिका सौ.महानंदा शिंदे वर्गशिक्षिका सौ.सोनाली कोनाळे, प्रकाश बोरगावकर, बाळासाहेब शिंदे सौ.शितल काळदाते सौ.संगीता मोरे सौ.ज्योती काळे तेलंग सूर्यकांत, पंडित चव्हाण, विजय भिसे, यांनी अभिनंदन केले आहे.

अवैधरित्या तलवार बाळगून दहशत माजवणाऱ्या विरुध्द माजलगांव शहर पोलीसांची कारवाई

माजलगांव । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज चौकात दि १४ मार्च शुक्रवार रोजी इसम नामे अमोल बबनराव गावडे रा. पंचशीलनगर माजलगाव हा अवैधरित्या स्वतःचे ताब्यात तलवार बाळगून परीसरात दहशत माजवत असल्याची माहिती माजलगांव शहर पोलीसांना मिळाल्याने नमुद इसमाविरुध्द पोलीसांनी ६:०० वाजण्याच्या सुमारास छापा मारून त्यास तलवारीसह ताब्यात घेऊन

त्याच्या ताब्यातून एक लोखंडी तलवार जप्त करण्यात आली असुन अमोल बबनराव गावडे रा. पंचशीलनगर माजलगाव याचे विरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये कारवाई करण्यात आली.

सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड,श्रीमती चेतना तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई,नीरज राजगुरु पोलीस उपअधीक्षक उपविभाग गेवराई, अति.पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक आकाश माकणे, पोहेकॉ किशोर जाधव,पोलीस अंमलदार सुनिल गवळी यांनी केली आहे.

पान १ वरून...

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्राने

ऊस शेतीचे चित्र बदलेल, असा विश्वास विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी व्यक्त केला. पुढे ते म्हणाले, ''मागील काही काळात उसाची उत्पादकता वाढली नाही. त्यामुळे उसाची उत्पादकता वाढवणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वसमावेशक विकास घडवून आणावा लागेल. सध्या मराठवाडा आणि सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सरासरी ८१ दिवसांवर आला आहे. उसाच्या अभावी कारखाने बंद होत आहेत. ऊस उत्पादकतेवर परिणाम होत आहे. उसाची उत्पादकता सरासरी ८८ टन होती. आता ७० ते ७२ प्रति टनांवर आली आहे, असंही ठोंबरे म्हणाले. तर कृषी आणि वाणिज्य मंत्रालयाने एकत्र काम केले पाहिजे. तरच शेतकऱ्यांना फायदा होईल, असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले. दरम्यान, राज्य सरकारने २०२५–२६ च्या अर्थसंकल्पात ऊस शेतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यासाठी ५०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे.

सतीश भोसलेचे घर पाडण्यासाठी

धस यांचा कट्टर कार्यकर्ता आहे. सतीश भोसलेच्या शिरूर कासार गावातील घरावर बुलडोझर फिरवण्यात आल्यानंतर अनेकांकडून ती जमीन वन विभागाची असल्याचे म्हटले तर काहींचे म्हणणे आहे ते जमीन वाटप करण्यात आली आहे. या घटनेत संपूर्ण माहिती घेऊन याबाबत कलेक्टर आणि वनविभागाला विचारणा करणार असल्याचे सुरेश धस यांनी सांगितले.

संस्थाचालकाच्या जाचाला

कंटाळून आपण आत्महत्या करत असल्याचं त्यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे. श्रावणी बाळा तुझ्या बापुला शक्य झालंच तर माफ कर. मी माफी मागायच्या पण लायकीचा नाही. बाळा मी तुझ्यासाठी खूप स्वप्न पाहिली होती. पण त्या स्वप्नांना स्वप्नातच ग्रहण लागलं. काय करू माझ्या मनात कधी स्वार्थ आलाच नाही. मी कधी कुणाला दोन रूपयांना फसवलं नाही किंवा कुणाचं कर्जही घेतलं नाही. श्रावणी बाळा शक्य झालंच, तर तुझ्या बापूला एकदा माफ कर. कारण मी तुला एकटीला सोडून जात आहे. तुला अजून काहीच कळत नाही, तुझं वय आहेच किती... तीन वर्षे... तुला काय कळणार.... ज्यांना कळायला पाहिजे होतं, त्यांना बापू कधी कळला नाही. बाळा बापूंनी कधीच कुणाचं नुकसान केलं नाही. सर्वांसोबत चांगला वागला. पण या नालायक राक्षस लोकांनी माझा अंधारातून खूप छळ लावला आहे. विक्रम बाबुराव मुंडे, विजय विक्रम मुंडे, अतुल विक्रम मुंडे आणि त्यांचे कार्यकर्ते उमेश रमेश मुंडे, गोविंद नवनाथ आव्हाड आणि ज्ञानेश्वर राजेभाऊ मुरकुटे यांनी माझा खूप छळ लावला आहे. मला हे हालहाल करून मारणार आहेत. मला मारण्याचं कारण म्हणजे मी त्यांना फक्त विचारलं होत की, मी तुमच्या शाळेवर गेली १८ वर्षे काम करतोय. मला अजून पगार नाही. आता पुढे काय करायचं? त्यावर विक्रम बप्पा म्हणाले तू फाशी घे म्हणजे तू मोकळा होशील आणि मी पण तुझ्या जागेवर दुसरा कर्मचारी भरायला मोकळा होईल. हे ऐकून माझ्या पायाखालची जमीनच सरकली. दरम्यान, इथून पुढे या लोकांनी मला त्रास द्यायला सुरुवात केली. श्रावणी बाळा हे सर्व राक्षस आहेत, या राक्षसांमुळेच मी तुझ्यापासून दूर जातोय. तुला एकदा पाहण्याची माझी खूप इच्छा होती. पण मी एक दळभद्री बाप तुझ्या वाट्याला आलो. काय करू माझ्यापाशी कोणता पर्यायच या लोकांनी ठेवला नाही. बाळा डोळ्यातलं पाणी थांबत नाही. पण त्याग केल्या शिवाय पर्याय नाही. श्रावणी मला माफ कर... मी माफी मागण्याच्या पण लायकीचा नाही, तरी पण शक्य झालं तर, जेव्हा तुला कळेल तेव्हा माफ कर..आता मी थांबतो खूप त्रास होतोय मला... अशी पोस्ट लिहून नागरगोजे यांनी आत्महत्या केली आहे.

बीड, अमरावतीत होत असलेल्या

नीती ठरवावी हा आग्रह धरणार आहोत. या कामात लक्ष घातले जाईल. सरकार याविषयी कठोर पाऊल उचलेल असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला. शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, बीड जिल्ह्याला मी अनेक वर्षे ओळखतो. पण आज जी बीडची अवस्था आहे ती कधीही नव्हती. शांत व समन्वयाने सगळ्यांना सोबत घेऊन जाणारा जिल्हा म्हणून बीडला ओळखतो. बीड जिल्ह्याचा माझा अनेक वर्षांचा अनुभव आहे. मी स्वतः जेव्हा त्या भागात लक्ष देत होतो, तेव्हा तिथे सहा–सहा सदस्य निवडून आले होते, तिथे एक प्रकारे सामंजस्याचे वातावरण होते. पण दुर्दैवाने काही लोकांनी सत्तेचा गैरवापर करण्याची भूमिका घेतली. त्याचे दुष्परिणाम आपल्या गत काही महिन्यांत दिसून येत आहेत. माझे स्पष्ट मत आहे की, राज्य सरकारने यात कुणाचा हात आहे याचा विचार न करता जो कुणी कायदा हातात घेईल, वातावरण खराब करेल, त्यांच्याविरोधात अत्यंत सक्त धोरण आखण्याची गरज आहे. त्यातून बीडला पूर्वीचे वैभवाचे दिवस कसे येतील याची काळजी घ्यावी अशी सूचनाही यावेळी केली.

धनंजय मुंडेंची आमदारकी १००

पुढे त्यांनी राजीनामा दिला. आता येत्या ६ महिन्यात त्यांची आमदारकी देखील जाईल. एका वर्षाच्या आत परळीमध्ये पुन्हा निवडणूक होईल. विधानसभेच्या शपथ पत्रात त्यांनी खोटी माहिती दिली आहे. त्यामुळे १०० टक्के त्यांची आमदारकी जाणार, असा दावा करुणा शर्मा यांनी केला आहे. तसेच या प्रकरणाची पुढील सुनावणी ही पुढच्या महिन्यात होणार आहे.

बीडच्या गांजा तस्कर कल्याणमध्ये सापडला

आणखीन काही गुन्हे दाखल आहे का? याचाही तपास पोलिस करीत आहेत. त्याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत २ लाख ४८ हजार रुपये आहे.

सोयापेंड निर्यातीसाठी

आहेत. ही मागणी खरेच शेतकऱ्यांसाठीच आहे का? कारण आतापर्यंत जवळपास ७० टक्के शेतकऱ्यांनी सोयाबीन विकले गेले आहे. राज्याच्या कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल म्हणातात की, सरकारने सोयापेंड निर्यातीसाठी ५ हजार कोटींचे अनुदान दिले तर सोयाबीनचा भाव साडेपाच हजारांवर पोहचेल. पण याचा सोयाबीन ४ हजाराने विकलेल्या शेतकऱ्यांना काय फायदा होणार? हे मात्र त्यांनी सांगितले नाही. दरम्यान, सोयाबीनची काढणी होऊन ५ महीने झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांना निर्यात अनुदान देण्याचे सूचत असेल तर त्यात शेतकऱ्यांचा विचार दिसत नाही. सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना खरेच दिलासा द्यायचा असेल तर भावांतर योजना राबवून शेतकऱ्यांना हमीभाव आणि बाजारभावातील फरक द्यावा, असे अभ्यासकांनी म्हटले आहे.

आता घरकुलासाठी मिळणार मोफत

मोफत रेती देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतला आहे. त्यासाठीही आम्ही तरतूद करणार आहोत, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली. पुढे म्हणाले की, एकंदरीत जेवढी मागणी असेल, तेवढा पुरवठा असे वाळू धोरण आपण तयार करत आहोत. त्यासाठी एम सँड धोरण येत आहे. त्यामध्ये दगड खाणींमधून येणाऱ्या वाळूसाठी आम्ही प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्टो क्रशरसाठी प्रोत्साहन देत आहोत. त्यामाध्यमातून दगडापासून मोठ्या प्रमाणात वाळू तयार होणार असून, त्यामुळे नदीतील वाळूची मागणी कमी होईल. तसेच येत्या दोन वर्षांत वाळूची मागणी आणि पुरवठा यामध्ये जी काही तफावत आहे ती दूर होईल, असेही बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

औरंगजेबची कबर नष्ट

अबू आझमींच्या वक्तव्यानंतर औरंगजेबाची कबर काढून टाका या मागणीसाठी आता विश्व हिंदू परिषदेसह बजरंग दलही आक्रमक झाला आहे. औरंगजेबाची कबर हटवा अन्यथा बाबरीची पुनरावृत्ती होईल असे म्हणत या दोन्ही संघटना आक्रमक झाल्या आहेत. राज्यभर एकाच दिवशी औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीसाठी आंदोलन होणार असून, सकरकारने कबरीबाबत निर्णय घेतला नाही तर मात्र आम्ही बाबरी मशिदीची पुनरावृत्ती करत ती कबर हटवू अशा इशारा बजरंग दलाने पुण्यात दिला आहे. शिवजयंती म्हणजेच १७ मार्च रोजी विश्व हिंदू परिषद राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कबर हटवा या मागणीसाठी आंदोलन करणार असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यादिवशी निवेदन देखील देण्यात येणार आहे.

कबरीजवळ बंदोबस्त वाढवला, एसआरपीएफची तुकडी तैनात

औरंगजेबाच्या कबरीजवळ बंदोबस्तात मोठी वाढ करण्यात आली असून एसआरपीएफची एक तुकडी आणि दोन अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. एसआरपीएफच्या या तुकडीत १५ पोलिस कर्मचारी आहेत. कबर परिसराकडे जाताना दोन ठिकाणी फिक्स पॉइंट उभारण्यात आले असून या ठिकाणी नाकाबंदी केली जात आहे. पर्यटकांची कसून तपासणी केली जात आहे. तपासणीनंतरच त्यांना कबरीकडे सोडले जात आहे. काही पोलिस साध्या वेषातही तैनात करण्यात आले असून ते परिस्थितीवर नजर ठेवून आहेत.

कशासाठी पाहिजे औरंगजेब तुम्हाला?: आ. शिरसाट

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आणि शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी केली आहे. औरंगजेबाची कबर इथे नको. कशासाठी पाहिजे? तो त्रास आम्हाला कशाला पाहिजे? एक राजा तिकडून येतो काय, इथल्या हिंदूंची मंदिरे पाडतो काय, महिलांवर अत्याचार करतो काय, अनेक लोकांना छळतो काय, त्याने गरम सळया टाकून संभाजी राजांचे डोळे काढले, नखे काढली. ४० दिवस हालहाल करून मारले. त्याची आठवण आम्हाला कशाला पाहिजे? कशासाठी पाहिजे औरंगजेब तुम्हाला इथे? असे सवाल संजय शिरसाट यांनी केले आहेत.

ओळखपत्र हरवले

श्री.रामदास धोंडीबा नागरगोजे (माजी सैनिक) या नावाची फौजी चे ओळखपत्र शिरूर पाटोदा बस मध्ये प्रवासा दरम्यान हरवले आहे कोणाला मिळाल्यास या फोन नंबर वर संपर्क साधावा.
संपर्क मो.नं : ८००७६४२०७३

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. १६ मार्च २०२५

माजलगाव आगाराचा गलथान कारभार

प्रवाशांचा जिव धोक्यात घालुन मोबाईल टॉर्च लावुन आणावी लागली बस



माजलगाव । प्रतिनिधी

येथील आगारातील ना-दुरुस्त बसेस ग्रामीण भागातील फेऱ्या साठी सोडत असल्याचे माजलगाव आगाराच्या गलथान कारभाराला ग्रामीण भागातील प्रवासी वैतागले असुन दि १५ मार्च शनिवार रोजी सायंकाळी माजलगाव - पुरुषोत्तमपुरी हि बस माजलगाव आगारातुन पुरुषोत्तमपुरी येथील प्रवासी घेऊन पुरुषोत्तमपुरी येथे सदर बस पोहचली मात्र ज्ञदर बस पुरुषोत्तमपुरी येथुन माजलगाव कडे निघाली असता सदर बसचे समोरील दोन्ही हेडलाईट बंद पडल्यामुळे बस चालक व वाहक यांची मोठी तारांबळ उडाली मात्र वाहक आणी चालक यांनी त्यांची अनोखी शक्कल लढवत त्यांनी चक्क सदर दोन्ही लेडलाईट अभावी बंद पडलेली बस मोबाईल टॉर्च चा आधार घेऊन प्रवाशांचा व स्वतःचा जीव धोक्यात घालून बस पुरुषोत्तमपुरी - माळेवाडी या ठिकाणाहून माजलगाव कडे रवाना केली.

माजलगाव नगरपरिषदेच्या कर वसुलीस स्थगिती देण्यास दिवाणी न्यायालयाचा नकार

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव नगरपरिषदेने केलेल्या कर (टॅक्स) वसुली बाबत अनेक व्यावसायिकांची व व्यापाऱ्यांची नाराजगीमुळे डॉ. सुशिल लोढा, गणेश थिगळे व मनोज शर्मा यांनी दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) माजलगाव यांच्या न्यायालयात कर वसुलीची नोटीस रद्द करणे बाबत तसेच सदर कर वसुली स्थगित करणे बाबत दावे दाखल केले होते. सदर प्रकरणात सुनावणी होवून कर वसुलीस स्थगिती देण्यास दिवाणी न्यायालयाने नकार दिलेला आहे.सदर प्रकरणात माजलगाव नगरपरिषदेच्या वतीने अँड.बी. आर.डक यांनी युक्तीवाद केला.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, माजलगाव नगर परिषदेने सन २०१७ व २०१८ मध्ये शहरातील निवासी व्यावसायिक बांधकामांचा व अन्य जागेचा कर आकारणी बाबत सर्वे केला होता. त्या अनुषंगाने आक्षेप मागवले. ज्याच्या सुनावण्या सन २०२० मध्ये झाल्या. त्यानंतर सदर प्रकरणात सुनावणी होवून सन २०२१ मध्ये कर वसुलीच्या नोटीस देण्यात आल्या होत्या. सदर कर वसुलीच्या नोटीस विरुध्द डॉ. सुशिल लोढा, गणेश सदाशिव थिगळे,मनोज रामगोपाल शर्मा यांनी कर वसुलीची नोटीस रद्द करणे बाबत तसेच कर वसुलीस स्थगित मिळणे बाबत रे. दि. दा.नं.९६/२०२१, रे. दि.दा. नं. ९७/२०२१ व रे.दि.दा.नं. ९८/ २०२१ असे तीन दावे दाखल केले होते.

सदर दाव्यात नगरपरिषद माजलगाव च्या वतीने अँड.बी. आर.डक यांनी लेखी बाजु मांडुन युक्तीवाद केला व संपूर्ण सुनावणी अंती न्यायालयाने माजलगाव नगरपरिषदेच्या कर वसुलीस स्थगिती देण्यास नकार दिलेला आहे.या निर्णयामुळे माजलगाव नगरपरिषदेच्या कर वसुलीस कायदेशीर अडथळा दूर झालेला आहे.या प्रकरणात नगरपरिषद माजलगाव च्या वतीने अँड. बी. आर.डक यांनी बाजु मांडली व त्यांना अँड.संभाजी होके पाटील,अँड. दत्ता जाधव,अँड. गणेश गवळी,अँड. अरबाज नासेर खान व अँड.गणेश जी.वरपे यांनी सहकार्य केले.

जालना : येथे हत्ती रिसाल ची स्थापना १८८९ वर्षी झाले असून पारंपारिक पद्धतीने कुंभार गल्ली रंगात खिडकीतून अकरा वाजता हत्ती रिसाल ची मिरवणूक काढण्यात आली यावेळी खा. डॉ. कल्याण काळे, पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल , अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी ,अंकुश राऊत व इतर समिती सदस्य उपस्थित होते रंगार खिडकीतून निघून गोल मस्जिद मारवाडी गल्ली सराफा रोड फुल बाजार रामदेव बाबा मंदिर महावीर चौक मामा चौक पाणीवेस पोलास गल्ली येथे पारंपारिक पद्धतीने विसर्जन होते. छायाचित्र किरण खानापुरे

धम्मगिरी चॅरिटेबल ट्रस्टतर्फे पौर्णिमा उत्साहात साजरी

अंबड । प्रतिनिधी

धम्मगिरी चॅरिटेबल ट्रस्ट, अंबड (रजिस्ट्रेशन नंबर -६१९ (ग)) यांच्या वतीने परंपराप्रमाणे खीरदान व भोजनदान करून पौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आली. तथागत भगवान बुद्ध, महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समता, बंधुता, न्याय आणि नीती यांच्या विचारधारेचा प्रसार करण्याच्या उद्देशाने कालकथित सुरू केलेली धम्मचळवळ धम्मगिरी चॅरिटेबल ट्रस्ट पुढे नेत आहे आणि तसेच परंपरा सुरू आहे.

पौर्णिमेच्या निमित्ताने १३ मार्च रोजी पूज्य भंते यांच्या हस्ते पूजा, वंदना व परित्राण पाठ झाला. यावेळी थायलंड चे पूज्य भंते बुनली महास्थवीर, भंते महाथेरो, भंते खमसिंग, व भंते राजरत्न, यांच्या हस्ते भगवान बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्ती ची पूजा केली व त्यानंतर खीरदान व भोजनदान करण्यात आले. या पौर्णिमा निमित्त हे खीर दान व भोजनदान ठेवले होत. व सर्वांनी त्याचा लाभ घेतला या निमित्ताने उपासक-उपासिकांना या पवित्र सोहळ्यास मोठया प्रमाणावर उपस्थीत होते.

अंत:करणातील विकार जाळणे म्हणजे खरी होळी साजरी ककरण- ह.भ.प.त्र्यंबक महाराज मातकर

बीड । प्रतिनिधी

प्रत्येक माणसाने आपल्या अंतःकरणातील विकार लक्षात घेऊन ते जाळून टाकणे म्हणजे खरी होळी साजरी करणे होय असे प्रतिपादन बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येळंबघाटचे उपप्राचार्य श्री हभप त्र्यंबक महाराज मातकर यांनी केले आहे. नागापूर (बु) ता.जि.बीड येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात ते बोलत होते.जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा ३७५ वा बीजोत्सव व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केला आहे.या गावात अखंड हरिनाम सप्ताहाची ही परंपरा गेल्या ११२ वर्षांपासून श्रद्धेने अखंडपणे चालू आहे.

पंचम वेद अभंगगाथा रचिते जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या , बहुजन्मे केला लाग तो हा भाग लाधलो जीव देईन मी बळी करीन होळी संसारा या अभंगावर अतिशय विस्तृत व अंतर्मुख करणारे चिंतन त्यांनी केले.साधुसंतांनी विकारांची होळी जाळली.आपणास प्राप्त मनुष्य देह चौऱ्याऐंशी लक्ष फेऱ्यानंतर मिळाला आहे.याच जन्मात भगवंत भजनाने जन्ममरण चुकवून भगवंत प्राप्तीचे ध्येय साध्य होणार आहे.असे अनेक प्रमाणाने पटवून दिले. आज भारताचा सांस्कृतिक ठेवा धोक्यात आला आहे.आपल्या पूर्वजांचा सण -उत्सव साजरा करण्यामागे व्यापक, सहिष्णू व आनंदाची उधळण करत एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होण्याचा व्यापक दृष्टिकोन होता.परंतु आज सण उत्सवांना एक बिभत्स रूप आले आहे.झगमगाट आणि भोगवादी संस्कृतीचा उन्माद वाढत आहे. हे कुटुंबासाठी, समाजासाठी अंतिमतः राष्ट्रासाठी धोकादायक आहे.होळीच्या निमित्ताने विकार जाळणे संतांना अपेक्षित आहे पण दुर्दैवाने विकार प्रबळ करणारे प्रकार घडत आहेत.चंगळवादी, भोगवादी जगण्यासाठीच आपण जन्माला आलो आहोत असे आजच्या तरूण पिढीला वाटत आहे.त्यामुळे मोठ्या प्रमाणावर तरुण व्यसनी होत आहेत.अजून वेळ गेलेली नाही.वेळीच सावध होऊन पालकांसह प्रत्येक क्षेत्रातील धुरीनांनी हे वैचारिक प्रदुषण रोखले पाहिजे.अन्यथा प्रचंड सामाजिक समस्या निर्माण होतील.विशेषतः वारकरी संप्रदायातील मंडळींनी पुढाकार घेऊन शालेय अभ्यासक्रमात संतांच्या अभंगांचा समावेश कराण्यासाठी आग्रह केला पाहिजे असे अनमोल वैचारिक मंथन त्यांनी केले. यावेळी कीर्तन साथसंगतीसाठी गायनाचार्य बंडू महाराज जटाळ, मृदंगाचार्य कृष्णा महाराज टाले, हनुमान महाराज लव्हाळे, भागवत महाराज गुरव, विष्णु महाराज लांडे ,सिद्धेश्वर महाराज मोरे ,अभिषेक टाले , साळ्कीराम साळुंके, जनार्दन कानडे ,नामदेव साळुंके ,महादेव महाराज ,दिगंबर महाराज, किसन मस्के ,पद्युले गुरुजी, कानिफनाथ महाराज, महेंद्र साळुंके ,भागवत साळुंके, सखाराम पवार यांच्यासह अनेक गुणवान टाळकरी उपस्थित होते. कीर्तनासाठी प्राचार्य जयवंत टेकाळे सर, जवळा हायस्कूलचे आदर्श शिक्षक श्री शंकर टेकाळे सर, बाबासाहेब कदम, वैजनाथ साळुंके इमामपूरकर, भगवानराव परसकर, महादेव कदम, श्यामराव कंधारे गुरुजी, माजी सरपंच सिद्धार्थ ढोकणे ,सरपंच किशोर ढोकणे ,उपसरपंच आशाताई शंकरराव टेकाळे, युवक काँग्रेस प्रदेश सचिव राहुल टेकाळे, माजी सरपंच रावसाहेब टेकाळे ,चेअरमन महादेव शिंदे, ग्रामपंचायत सदस्य बाबुराव साळुंके ,नागनाथ सिंगन ,भरत साळुंके सुनील कंधारे ,बाजीराव खराडे ,शेषराव टेकाळे, कालिदास खराडे ,संदीपान कदम,लळू चव्हाण,नागनाथ मित्र मंडळ ,महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिरूर तालुक्यातील जनतेच्या प्रश्नासाठी आ. सुरेश धस यांची आज आमसभा

तालुक्यातील जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-गणेश भांडेकर

शिरूर । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा- शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांच्या वतीने रविवार दि. १६ मार्च रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर आमसभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी तालुक्यातील जनतेने आपले प्रशासन दरबारी प्रलंबित पडलेल्या कामांना गती प्राप्त करून घेण्यासाठी या आमसभेत उपस्थित राहून आपली अडचण आ. सुरेश धस समोर मांडावी असे आवाहन शिरूर कासार नगरपंचायतचे गट नेते तथा नगरसेवक गणेश भांडेकर यांनी केले आहे.

आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघांमध्ये आमदार सुरेश धस हे जनतेच्या कामासाठी सदैव तत्पर असतात. जनतेची कामे करणे हाच त्यांचा वसा असल्याने सुरेश अण्णा धस हे जनतेच्या मनातील लोकप्रिय आमदार झाले आहेत. शिरूर कासार तालुक्यातील जनतेची अनेक कामे वेगवेगळ्या कारणामुळे प्रशासन दरबारी प्रलंबीत पडली आहेत. अनेक वेळा प्रशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे जनता त्रस्त झालेली पाहायला मिळत आहे. गेल्या अनेक दिवसापासून प्रलंबित पडलेल्या प्रशासन दरबारातील महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत येणारे कामे जलसिंचन विहीर, शेततळे, रस्ते,घरकुल योजना, पशुसंवर्धन, पंचायत समिती कृषी विभाग, तहसील अंतर्गत येणारे कामे, संजय गांधी निराधार योजना, शेतात जाणाऱ्या रस्ते, ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या योजना, शिक्षण विभाग, वनविभाग, कृषी विभाग, आदी कामे प्रलंबीत पडली आहेत या सर्व कामाना मार्गी लावण्यासाठी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांच्या वतीने रविवार दि. १६ मार्च रोजी शिरूर पंचायत समिती कार्यालयासमोर दुपारी २ वाजता आम सभेचे आयोजन करण्यात या आमसभे तालुक्यातील जनतेने राहून आपले गाऱ्हाने मांडावे. या आमसभेसाठी सर्व प्रशासकीय विभागातील अधिकारी हजर राहणार असून आमसभे मध्ये जनतेचे तक्रारीचे निवारण जागेवरती करून देणार आहेत. तरी शिरूर कासार तालुक्यातील जनतेने आपापल्या कामे मार्गी लावण्यासाठी आ. सुरेश अण्णा धस यांनी आयोजित केलेल्या या आम सभेला मोठ्या संख्येने त उपस्थित राहून आपापली कामे मार्गी लावून घ्यावीत असे अवाहन शिरूर कासार नगर पंचायतचे गट नेते तथा नगरसेवक गणेश भांडेकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान ६ वरून...

हाती काम आणि मुखी

वतीने त्यांचा भागवताचार्य ह.भ.प.कांतामाई सोनटक्के महाराज यांनी पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.त्यानंतर प्रवचन सेवेत त्या बोलत होत्या. ह.भ.प.सौ. बबीताताई बोडखे पुढे म्हणाल्या की, कलियुगात स्वतःचा उद्धार करण्यासाठी अध्यात्म हे साधन आहे. ज्ञानेश्वरांनी भक्ती योगात १२ व्या.अध्यायात या अनुषंगाने विवेचन केलेले आहे. हाती काम आणि मुखी भगवंताचे नाम घ्या.. भगवंत नक्की उद्धार केल्याशिवाय राहणार नाही! असा विश्वास त्यांनी उपस्थित भाविकांना दिला.संसारात राहून हा भक्तीचा मार्ग करता येऊ शकेल हे विशद करत त्यांनी भक्तीचे मूल्य आणि महत्त्व प्रतिपादन केले.भारत देश जगात श्रेष्ठ असून येथील कुटुंब व्यवस्था जगात आदर्शवादी आहे.देशाला संकटातून जाण्यासाठी भविष्यातसुद्धा वारकरी संप्रदायाचा उद्धार करावा लागेल अशी अपेक्षा व्यक्त करून कीर्तन प्रवचन सप्ताह यामुळे बंधुत्व आणि आत्म्याचा उद्धार होऊ शकेल हा विश्वास त्यांनी शेवटी दिला.यावेळी ज्ञानेश्वर सेवा संस्थांचे सचिव ह.भ.प.शिवाजी महाराज बिडवे महाराज,रविंद्र तवले,विष्णु धोंडे यांच्यासह गायक, वादक,रसिक श्रोते महिला भगिनी जेष्ठ नागरिक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांच्या वतीने आभार मानण्यात आले.

भगवंताच्या नामाची मोठी ताकद!

सौ.बबिताताई बोडखे महाराज यांनी आपल्या प्रवचन सेवेमध्ये भगवंताच्या नामाची ताकद फार मोठी असल्याचे सांगितले. दरम्यान,साधुसंत हे देवा पेक्षाही श्रेष्ठ असल्याचा दाखला देत संत ज्ञानेश्वरांच्या अनेक दृष्टांतांचा त्यांनी गौरवाने उल्लेख आणि विशद करत निरूपण केले. भवरवाडीसह परिसरातील उपस्थित महिला भगिनी आणि भक्तांनी या प्रवचन सेवेचा लाभ घेतला.

आजच्या धनगर समाज

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.सर्जेराव काळे धनगर समाजाचे नेते तथा माजी जिल्हा अध्यक्ष काँग्रेस आय बीड व अभियंता हनुमंत काळे,मनोहर पिसाळ,प्राध्यापक भगवान माने, बाळासाहेब दोडताले,ह.भ.प. सुरेशानंद महाराज,डॉ.शिवाजी राऊत, शारदाताई पांढरे,माधव निर्मळ, प्रभाकर वाघमोडे,कल्याणराव आबुज,प्रकाश गवते,बबनराव सरवदे, प्रकाश सोनसळे,इंजि.विष्णू देवकते, सुरेश काळे,देविदास शेंडगे, अण्णासाहेब मतकर,प्रा.गणपतराव काकडे,हनुमंत काळे,राजेंद्र भोंडवे आदीसह बीड जिल्ह्यातील आजी- माजी सरपंच,उपसरपंच,ग्रा.पं.सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन तसेच सर्व धनगर समाज सामाजिक संघटनेचे पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभणार आहे.

रविवारी आष्टी येथे

पोकळे, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष प्राचार्य शशिकांत कन्हेरे, जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष शिवमती सुवर्णाताई गिर्हे, प्रा. डॉ. बाबासाहेब मुटकूळे,मारुतीराव तिपाले,हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत,

मराठा समाजातील अनेक तरुण-तरुणी इच्छित स्थळ मिळत नसल्याने अविवाहित आहेत. वराची किंवा वधूची माहिती घेऊन त्यांना मनपसंत जोडीदार मिळवून देण्यासाठी मराठा समाज प्रयत्न करणार आहे. त्याचे पहिले पाऊल या वधूवर महामेळाव्याने उचलले आहे. अनेक पालकांनी मराठा समाजाकडे वधूवर मेळावा घेण्याची विनंती केल्याने समाजाच्या आग्रहाखातर या मेळाव्याचे आयोजन केले आहे. इच्छुक वधू-वर किंवा त्यांच्या पालकांनी नावनोंदणी सगेसोयरे वधु-वर सेवा केंद्रांचे हरीभाऊ जगताप यांच्याकडे करावी, असे आवाहन मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

पान ६ वरून...

एजंटगिरी खपवून

व्यक्त केली कार्यक्रमाचे प्रास्ताविक विकास अधिकारी गोकुळ बागलाण यांनी केले सुरुवातीलाच पिंपरी-घुमरीचे सरपंच यांनी ग्रामीण भागातील घरकुलासाठी वाढीव अनुदान कधी मिळणार व कडा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये म** टाकूनही आम्हाला दोन दोन वर्ष पट्टी मिळत नाही यावर कसे पण बाजार समितीचे सभापती रामदांता मुळे यांनी बाजार समितीची बदनामी न करता रीतसर तक्रार द्या यावर आम्ही दोन दिवसात प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले तसेच नगराध्यक्षाची अभियोग यांनी आष्टी नगरपंचायत अंतर्गत शेतकऱ्यांना वैयक्तिक लाभ विहिरी व शेत तलाव या योजनेचा लाभ मिळावा यासाठी शासन दरबारी आमदार धस यांनी पाठपुरावा करून लवकरच एक जीआर काढावा तसेच शहरासाठी रोटी प्रकल्पातून सोडलेले पाणी बंद करून आष्टी मोक्ष पुरुषांसाठी ते राखीव ठेवा अशी मागणी देखील बेग यांनी केली यावेळी दादासाहेब पांढरे पर्यंत गायकवाड यशवंत खंडागळे अनिल ढोबळे बापूराव ससाने सरपंच संदीप हाकाळ युवराज शिंदे शरद खांडवे जाधव रामा काशीद बाळासाहेब बांगर परमेश्वर घोडके हनुमंत जीवे बाळासाहेब खेडे दत्ताभाऊ वारेकर आत्माराम फुंदे विजय डुकरे अंग शिंदे शिवाजी गर्जद धनंजय तरटे सागर आमले यांच्यासह शेकडो नागरिकांनी आपले घराणे आमसभेत मांडले. आम सभेत कारखेलच्या दांड्यावरून काही महिला हंडा घेऊन आल्या होत्या आयोजित करण्यात आलेले आमचे वेद तालुक्यात तील कारखेल खुर्द येथील महिला आमच्या तांड्यावर पिण्याच्या पाण्याची सोय नसून आम्हाला शिव रस्ता देण्यात यावा अशी मागणी या महिलांनी केली आम सभेला तालुकाभरातून मोठ्या संख्येने नागरिक व महिला उपस्थित होत्या अनेकांनी आता या मतदारसंघाला आमदार धस यांच्या रूपाने एक लोक अभिमुख आमदार मिळाल्याने आनंद व्यक्त करत त्यांचे स्वागत करून अण्णा तुम्हीच आमच्या समस्या सोडवणार आहात असा आत्मविश्वास व्यक्त केला.

जोगाईवाडी येथे रोटरीने

कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, प्रोजेक्ट डायरेक्टर बालाजी घाडगे, को प्रोजेक्ट डायरेक्टर प्रदिप झरकर, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब दोडतले, यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते जोगाईवाडी येथे अमरधाव स्मशानभूमीचे लोकार्पण जोगाईवाडी येथील हॅप्पी स्कुलचे लोकार्पण सजावट करण्यात आलेल्या अंगणवाडीचे लोकार्पण तसेच प्लास्टीक मुक्ती अभियानातर्गत जोगाईवाडी येथील ग्रामस्थांना प्लास्टीक संकलणासाठी बॅरचे वाटप करण्यात आले. तर अंबाजोगाई तालुक्यातील धावडी शिवार येथे वॉटर अॅन्ड सॅनिटेशन प्रकल्पातर्गंत रोटरी बंधार्याचे लोकार्पण आर.एन.उद्योग समुहाचे संचालक मोईनभाई शेख, प्राजेक्ट डायरेक्टर शकिल शेख यांच्या उपस्थितीत प्रांतपाल व मान्यवरांनी या बंधार्याचे लोकार्पण केले. यावेळी डॉ.नवनाथ घुगे, सदस्य संतोष मोहिते स्वप्नी परदेशी, अंगद कराड, सुहास काटे, प्रा.रमेश सोनवळकर, सुरेश मोदी, गणेश राऊत, संभाजी बुरगे, बालासाहेब कदम, डॉ.बालासाहेब लोमटे, प्रविण चोकडा, राजेंद्र घोडके, जगदीश जाजू, विश्वनाथ लहाने, बालाजी घाडगे, शेख मोईन, शेख शकील,डॉ.अनिल केंद्रे, डॉ.सुरेश आरसुळे, ओमकेश दहिफळे, सचिन बेंबडे, अनिल लोमटे, अजित देशमुख, गणेश लोमटे, प्रदिप झरकर, शाम भन्साळी, भिमाशंकर शिंदे, गोपाळ पारीख, आनंद कर्नावट, प्रा.रोहिणी पाठक, मंजुषा जोशी, सुनंदा मुंदडा, रूपेश रामावत, जतीन कर्नावट यांच्यासह जोगाईवाडी येथील ग्रामस्थ उपस्थितीत होते. जोगाईवाडी येथील उपसरपंच सुनिल मस्के, ग्रामपंचायत सदस्य अबरार खान, मयुर रणखांब, गौरव लांबतुरे, मोरेश्वर जाधव, लहु सुरवसे, गणेश घाडगे, सौदागर कदम, नितीन घाडगे, जनार्धन घाडगे, कल्पना मिटकरी, तय्यब शेख, शेख बाबु भाई, सुधाकर घाडगे, गोपाळ खांडेकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

शिरूर येथील अतिक्रमित

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशान्वये वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सदस्य तथा राज्य उपाध्यक्ष प्राध्यापक किसन चव्हाण राज्य प्रवक्ते अॅट्रॉसिटी अरुण आबा जाधव जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्यासह सर्व जिल्हा तालुका कार्यकारिणी यांनी भेट देत पाहणी केली.

बेकायदेशीरित्या घरे पाडणाऱ्या वन विभागाच्या अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करत त्यांच्यावर कड्क शासन करावे अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सदस्य तथा राज्य उपाध्यक्ष प्रा.किसन चव्हाण यांनी केली, शिरूर वस्ती जळणाऱ्या गावगुंडांचा तात्काळ शोध घ्यावा अन्? अटक करावे अशी मागणी राज्य प्रवक्ते अॅड.अरुण आबा जाधव यांनी केली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाउपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, सचिन मेघडंबर, भीमराव औसरमल, अर्जुन जवंजाळ, धम्मानंद साळवे, अंकुश जाधव,राजेशकुमार जोगदंड, विष्णू देवकाते, सम्यक विद्यार्थी आंदोलनचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, ता.अध्यक्ष दिलीप माने, किरण वाघमारे, बाळासाहेब गायकवाड, मनोहर औसरमल, लखन जोगदंड, मिलिंद सरपते, अमर ससाणे, दीपक थोरात, किशोर भोले, प्रमोद निकाळजे, राहुल शिरोळे यांच्यासह असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

शिरूर येथील घडलेली घटना अत्यंत वेदनादायी आहे. आदिवासी भिल्ल पारधी वडार यांचा वस्तीवरील घरे गावगुंडांनी जाळली त्यामध्ये मुके जनावरे, पक्षी सुद्धा जळाले इतकी क्रूर मानसिकता दिसून आली. बीड जिल्हा प्रशासनावर राजकीय दबाव तंत्राचा वापर होत आहे. त्यामुळेच तर संबंधित लोकांना ७ दिवसाच्या आत अतिक्रमण काढावे अशी नोटीस देऊन दुसऱ्याच दिवशी त्यांची घरे वन विभागाने जेसीबीद्वारे पाडली हे निषेधार्य आहे.अजय सरवदे, जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (प)

उंदरखेल येथील वामन वस्तीवर

पोलीस अंमलदार शिवदास केदार, अमोल शिरसाठ यांनी भेट दिली.उंदरखेल येथील चोरीच्या अनुषंगाने तीन पथके तैनात करण्यात आली असून परिसरातील सीसीटीव्हीची तपासणी सुरू आहे.श्वान पथक,ठसे तज्ज्ञांना देखील पाचारण करण्यात आले आहे.असे ठाणेदार सपोनि मंगेश साळवे यानी सांगितले.

माजलगावात बहुजन नायक

पंकजाकुमार साळवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या जयंती कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.धम्मानंद बोराडे,पत्रकार रविकांत उघडे, रमेश जाधव,लिंबाजी सोनपसरे,चर्मकार संघटनेच बीड जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, सिद्धार्थ जाधव अशोक मगर, उद्योजक पद्माकर कांबळे,पेंटर पंकजकुमार साळवे,आदी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

शेतकरी संघटनेच्या वतीने

अशा भयानक परिस्थितीत अडचणीवर मात केली आहे.नवऱ्याने जीवन संपविल्यानंतर पदरी असलेल्या लेकरांचे पालन पोषण करताना प्रचंड मानापमान सहन केला.घरगुती अडचणीवर मार्ग काढला.समाजातील गैरप्रवृत्तीवर मात करून मुलाबाळांच्या शिक्षण,दवाखान्याचा खर्च काबाडकष्ट करून भागविला.या काळात अनेकींच्या वाट्याला अस्पृश्यतेची वागणूक आली.त्याच्याशी त्यांनी दोन हात केले.कुठल्याही सरकारी मदतीशिवाय मुलाबाळांना जगविले.या धैर्याचा सन्मान करावा या संकल्पनेतून सन्मान सोहळा आयोजित केला आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींना साडी चोळी करून सन्मानित करायचे आहे.याकामी किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने पत्रकार,लेखक सुदर्शन रापतवार तसेच आधार माणुसकीचा या स्वयंसेवी संस्थेचे प्रमुख अॅड.संतोष पवार यांनी पुढाकार घेतला आहे.शेतकरी आणि किसान पुत्रांनी आपली सामुदायिक जबाबदारी समजून या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केले आहे.

‘स्वाभिमानी’कडून अर्थसंकल्प, ‘शक्तिपीठ’ अधिसूचनेची होळी

परभणी : यंदा राज्य सरकारने केलेला अर्थसंकल्प व शक्तिपीठ महामार्ग अधिसूचनेच्या प्रति होळीत जाळून परभणी येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून सरकारचा निषेध करण्यात आला.

विधानसभा निवडणूक प्रचारात शेतकऱ्यांच्या सोयाबीनला प्रति किंटल ६००० रुपये, तर कापसाला प्रति किंटल ९००० रुपये भाव देऊ, संपूर्ण कर्जमाफी करू, शक्तिपीठ महामार्ग रद्द करू, यासारखी शेतकरी हिताची आश्वासने दिल्याने शेतकऱ्यांनी भर भरून मते दिली. सरकार बहुमताने निवडून आले. मुख्यमंत्री झाल्यावर देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरीमारक धोरण राबविण्यास सुरुवात केली. सोयाबीनला सहा हजार भाव तर सोडाच साधा हमीभावसुद्धा मिळत नाही. एकीकडे संपूर्ण सोयाबीन नाफेडमार्फत खरेदी करणार असल्याचे सांगितले होते. खरेदी बंद केल्यामुळे सोयाबीनचे



भाव ३५०० रुपयांपर्यंत कोसळले आहेत. कापसाचे, तुरीचे, हरभरा यांचे देखील असेच हाल होत आहेत. शेती पिकांचा उत्पादन खर्च भरून निघत नसल्याने शेती व्यवसाय तोट्याचा झाला आहे. कर्जमुक्ती करू असा दिलेला शब्द पाळायला सरकार तयार नाही. या अर्थ संकल्पात याची तरतूददेखील करण्यात आली नाही. निडणुकीत शक्तिपीठ महामार्ग रद्द करतो म्हणणारे आता हा मार्ग होणारच असे बोलत आहेत. अशी दुटप्पी भूमिका राज्यातील शेतकरी खपवून घेणार नाही. सरकारच्या चुकीच्या धोरणांचे होळीमध्ये दहन करत आहोत. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती तत्काळ करावी. शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा. या मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणाची होळी केली. स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष किशोर ढगे, रामप्रसाद गमे, प्रसाद गरुड, गजानन तुरे, कलीम भाई, पी. टी. निर्वल, जगन्नाथ जाधव, किशन शिंदे, कारभारी जोगदंड, विकास भोपळे, गजानन दुगाणे आदी उपस्थित होते.

जमिनीसाठी कोणतं शेणखत चांगल

आपल्याकडे सेंद्रिय खतामध्ये जास्तीत जास्त शेणखताचा वापर केला जातो. कारण बऱ्याच शेतकऱ्यांकडे घरची जनावरे असतात. या जनावरांकडून घरचं शेणखत मिळतं. त्यामुळे शेतकरी हे शेणखत उकिरड्यातून उपसून थेट शेतात पसरतात. पण हे शेणखत व्यवस्थीत कुजलेलं नसत. त्यामुळे या शेणखताचा पिकाला फायदा होण्यापेक्षा नुकसानच जास्त होत. जमिनीची सुपीकता जर टिकवून ठेवायची असेल तर सेंद्रिय कर्ब अत्यंत महत्वाचा आहे. जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर केला जातो. काही शेतकऱ्यांना वाटत शेतात शेणखत टाकल की झाल आता जमिनीला काही देण्याच गरज नाही पण तस नाही. रासायनिक खतांच्या तुलनेमध्ये शेणखतातून मिळणाऱ्या अन्नद्रव्यांचे प्रमाण हे कमी असतं. पण शेणखतामध्ये सेंद्रिय पदार्थांच प्रमाण जास्त असल्यामुळे जमिनीत उपयुक्त सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी अनुकूल वातावरण तयार होत.

शेणखत कुजलेल नसल्यास होतो परिणाम : शेणखत जर व्यवस्थित कुजलेलं नसेल तर शेणखत शेतात पसरविल्यानंतर कुजण्याची प्रक्रिया सुरु होते. कुजण्याच्या प्रक्रियेत शेणखताच तापमान वाढून जमिनीती मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण होते. या उष्णतेचा पिकाच्या मुळाला शॉक बसतो. त्यामुळे उत्पादनात घट येते. अर्धवट कुजलेल्या शेणखतामध्ये हुमणी भुंगेरावर्गीय किडींची अंडी, अळ्या असतात. कुजणाऱ्या शेणात मररोग, मूळकूज, करपा या रोगांसाठी कारणीभूत, बुरशी वाढू शकते. त्यामुळे पूर्णपणे कुजलेले शेणखतच वापरावे.शेणखत कुजविण्यासाठी उपाय : शेणखत चांगले कुजवण्यासाठी कंपोस्ट कल्चरचा वापर करावा. कंपोस्ट कल्चर शेणखतावर टाकून शेणखत चांगले खाली-वर करावे. प्रति टन शेणखतासाठी एक किलो किंवा एक लिटर कंपोस्ट कल्चर पुरेसे होते. शेणखतातून होणाऱ्या बुरशीजन्य रोगांचा प्रसार रोखण्यासाठी ट्रायकोडर्मा व्हिरिडी, सुडोमोनास फ्लुरोसन्स या जैविक घटकांचा वापर शेणखड्ड्यात करावा. हे घटक शेणखतावर टाकून शेणखत चांगल खालीवर करुन मिसळून घ्याव. यासोबतच शेणखतामध्ये खूप जास्त प्रमाणात शेणकिडे असतात. या शेणकिड्यांच्या नियंत्रणासाठी मेटारायझिम ॲनिसोप्ली, बिव्हेरिया बॅसियाना यांसारख्या जैविक कीडनाशकांचा वापर करावा. त्यात ओलसरपणा राहील इतके पाणी शिंपडावे.शेणखताचा वापर : शेणखताचा वापर करताना जमिनीची मशागत करताना शेवटी कुळवणीआधी हेक्टरी ५ ते १० टन शेणखत मिसळाव. तर भाजीपाला रोपवाटिकेमध्ये गादीवाफ्यावर चांगल्या कुजलेल्या शेणखतासोबत ट्रायकोडर्माचा वापर करावा. फळबागांसाठी उपलब्धतेनुसार एकरी १०-१५ टन शेणखत द्यावे. अशाप्रकारे शेणखत वापरताना काळजी घेतली तर शेणखताचा नक्कीच फायदा होईल.

जनावरांच्या पोटातील जंत : उपाय आणि नियंत्रण

पशुपालकांनाही दुहेरी नुकसान सहन करावे लागत आहे. सर्वप्रथम पोटात जंत येताच गाई, म्हशी किंवा मेंढ्या-मेंढ्या त्यांच्या सामान्य प्रमाणापेक्षा जास्त चारा खातात. दुसरीकडे, दूध उत्पादन आणि वाढ कमी होते. शिवाय या आजारामुळे पशुपालकांना उपचारासाठीही खर्च करावा लागत आहे. परंतु काही उपायांचा अवलंब करून पशुपालक त्यांचे नुकसान दूर करू शकतात आणि जनावरांना या समस्येपासून दूर ठेवू शकतात.

जंत झाल्यास होतात अनेक परिणाम : प्राण्यांच्या पचनसंस्थेच्या आत राहून, त्याचे ऊतक द्रव आणि रक्त शोषून घेतात. हे प्राण्यांच्या फुफ्फुसे, श्वासनलिका आणि डोळे इत्यादींमध्ये देखील आढळू शकतात. त्यांची अंडी शेणासोबत बाहेर पडतात ज्यामुळे कुरण, धान्य आणि पाण्याचे स्रोत दूषित होतात. हे चार प्रकारचे असतात, हुकवर्म्स (रक्त शोषणारे), टेपवर्म्स (पचनसंस्थेत आढळतात), ॲफिस्टोम (रुमेनमधील फ्लॅटवर्म्स) आणि यकृतामध्ये आढळतात), शिस्टोसोम्स (रक्त नसांमध्ये आढळतात). जनावराच्या पोटात कोणता जंत आहे यावर अवलंबून उपचार केले जातात.

जनावरांच्या पोटातील जंतांची लक्षणे : अतिसार, वाढ उशीरा, दुधाचे उत्पादन कमी होणे, प्रजनन क्षमता कमी होणे, काम करण्याची क्षमता कमी होणे, रोगाशी लढण्यात कमजोरी आणि अशक्तपणा. ॲफिस्टोम वर्मच्या बाबतीत, दुर्गंधीयुक्त जुलाब आणि खालच्या जबड्यात पाणी भरते. कधी कधी कावीळ ही ॲफिस्टोम वर्म्सच्या संसर्गामुळेही होते. टेपवर्मचा संसर्ग झाल्यास, लटकलेले पोट आणि त्याचा एक छोटा पांढरा तुकडा शेणात फिरताना दिसतो. हुकवर्म आणि शिस्टोसोम संसर्गामुळे, अशक्तपणामुळे रक्तरंजित अतिसार होतो. वाहणारे नाक आणि घोरणे हे शिस्टोसोमियासिसचे लक्षण आहेत. जनावरांच्या फुफ्फुसात कृमी झाल्यामुळे खोकला होऊ शकतो.

प्रतिबंध आणि उपचार : ॲंथेल्मिंटिकचा पहिला डोस १०-१४ दिवसांच्या वयाच्या वासराला द्यावा.

वासरू सहा महिन्यांचे होईपर्यंत वैद्यकीय सल्ल्यानुसार आहार देणे सुरू ठेवा. सहा महिने किंवा त्याहून अधिक वयाच्या सर्व जनावरांना वर्षातून दोनदा जंतनाशक औषध द्यावे, पहिली पावसाळ्याच्या आधी आणि दुसरी पावसाळा संपल्यावर. रुमेन बायपास टाळण्यासाठी, औषध तोंडात न देता जिभेच्या मागे द्यावे. जमिनीतील अंड्यांची संख्या कमी करण्यासाठी औषध फवारणी करावी. गाभण जनावरांनाही दोनदा जंतनाशक औषध द्यावे, पहिला डोस प्रसूतीच्या आसपास आणि दुसरा डोस प्रसूतीनंतर ६-७ आठवड्यांनी द्यावा. जनावरांना उपचाराचा फायदा होत नसेल, तर त्याच्या शेणाची पशुवैद्यकाकडून तपासणी करून अळीच्या प्रादुर्भावानुसार औषध वापरावे. गोगलगाय इ. ओलसर ठिकाणी वाढतात जेथे फ्ल्यूक आणि शिस्टोसोम संसर्ग होण्याची शक्यता असते. कारण या परजीवींचे जीवनचक्र गोगलगायींशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. औषधांचा प्रतिकार टाळण्यासाठी, एकाच प्रकारचे औषध वारंवार वापरू नका. जंतनाशक औषध फक्त वैद्यकीय सल्ल्यावरच वापरा, स्वत: ची औषधोपचार करू नका.



दिन विशेष

महत्वाच्या घटना

१५२१ : फर्डिनांड मॅगेलन जगप्रदक्षिणा करीत फिलिपाईन्सला पोहोचला.
१५२७ : मुघल सम्राट बाबर यांनी खानवा येथील युद्धात राणा सांगा यांचा पराभव केला होता.
१५२८ : फत्तेपूर-शिक्री येथे राणा संग व बाबर यांचे घनघोर युद्ध होऊन राणा संग याचा पराभव झाला. चैत्र शु. १४
१६४९ : शहाजीराजांच्या सुटकेसाठी शिवाजी महाराजांनी शहजादा मुराद (शहाजहानचा मुलगा) यास पत्र लिहीले.
१८४६ : प्रथम इंग्रज- सिख युद्धाच्या माध्यमातून अमृतसर ची संधी झाली होती.
१९११ : भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील एक उदारमतवादी राजकीय नेते व समाज सुधारक गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारतात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा ठराव मांडला.
१९१९ : भारतात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा ठराव गोपाळकृष्ण गोखले यांनी मांडला.
१९३७ : महाड येथील चवदार तळ्याचे पाणी दलितांना देण्याचा अधिकार मुंबई येथील उच्च न्यायालयाने दिला.
१९४३ : 'प्रभात'चा 'नई कहानी' हा चित्रपट रिलीज झाला.
१९४५ : दुसरे महायुद्ध रॉयल एअर फोर्सने तुफानी बॉम्बफेक करून जर्मनीच्या वुर्झबर्ग शहराचा २० मिनीटांत विनाश केला.
१९५५ : राष्ट्रीय लसीकरण दिवस
१९३६ : महाड येथील चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा दलितांना हक्क असण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला.
१९६६ : अमल कुमार सरकार यांनी भारताचे ८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९७६ : इंग्लंडचे पंतप्रधान हेरॉल्ड विल्सन यांनी राजीनामा दिला.
१९९२ : सत्यजित रे यांना ऑस्कर पारितोषिक प्रदान करण्यात आले.
२००० : हॉकीपटू धनराज पिल्ले आणि मध्य अंतराची धावपटू ज्योतिर्मय सिकदर यांना 'के. के. बिर्ला पुरस्कार' जाहीर
२००१ : नेल्सन मंडेला यांना राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते 'गांधी शांतता पुरस्कार' प्रदान
२०१२ : अंतरराष्ट्रीय क्रिकेट मध्ये १०० शतक बनवणारे क्रिकेट विश्वातील पहिले क्रिकेट पटू म्हणजेच भारतीय मास्तर ब्लास्टर सचिन तेंडूलकर हे होत.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६९३ : मल्हारराव होळकर इंदूरच्या राज्याचे संस्थापक, मराठेशाहीतील पराक्रमी सेनापती व मुत्सद्दी (मृत्यू: २० मे १७६६)
१७५० : कॅरोलिन हर्षेल जर्मन-ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ, ही प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ विल्यम हर्षेलची बहिण असुन तिने ८ धुमकेतू व ३ तारकासमुह शोधले आहेत. (मृत्यू: ९ जानेवारी १८४८)
१७५१ : जेम्स मॅडिसन अमेरिकेचे चौथे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २८ जून १८३६)
१७८९ : जॉर्ज ओहम जर्मन गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ६ जुलै १८५४)
१९०१ : प्र. बा. गजेंद्रगडकर भारताचे ७ वे सरन्यायाधीश (मृत्यू: १२ जून १९८१)
१९०१ : भारतीय क्रांतिकारक आणि महात्मा गांधी यांचे अनुयायी पोट्टी श्रीरामुलु यांचा जन्मदिवस.
१९१० : वे८ पतौडी नवाब इफ्तिखार अली खान पतौडी यांचा जन्म. (मृत्यू: ५ जानेवारी १९५२)
१९२१ : फहाद सौदी अरेबियाचा राजा (मृत्यू: १ ऑगस्ट २००८)
१९३६ : भास्कर चंदावरकर संगीतकार (मृत्यू: २६ जुलै २००९)
१९३६ : चित्रकार आणि कोरा कॅनव्हास चे लेखक प्रभाकर बर्वे यांचा जन्म.
१९३६ : एम.आर.आय. चे शोधक रेमंड वहान दमडीअन यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९९० : वि. स. पागे स्वातंत्र्यसैनिक, गांधीवादी कार्यकर्ते, संत वाङ्मयाचे अभ्यासक, महाराष्ट्र विधानसभेचे सभापती, रोजगार हमी योजनेचे जनक (जन्म: २१ जुलै १९१०)
१९४५ : गणेश दामोदर तथा 'बाबाराव' सावरकर कट्टर हिंदुत्त्ववादी आणि 'अभिनव भारत' संघटनेचे संस्थापक (जन्म: १३ जून १८७९)
१९४६ : 'गान सम्राट' उस्ताद अल्लादियाँ खाँ जयपूर -अत्रौली घराण्याचे संस्थापक व कोल्हापूर दरबारचे प्रसिद्ध गायक (जन्म: १० ऑगस्ट १८५५)
१९४७ : हिंदी साहित्य लेखक अयोध्या सिंह उपाध्याय 'हरि औंध' यांचे निधन.
१९९९ : कुमुदिनी रांगणेकर इंग्रजी लेखकांची मराठी वाचकांना ओळख करुन देणार्या लेखिका (जन्म:)
१९९९ : कुमुदिनी पेडणेकर गायिका
२००७ : मंजुरूल इस्लाम बांगला देशचा क्रिकेटपटू (जन्म: ४ मे १९८४)

उसावरील लाल कुज रोगाचे असे करा नियंत्रण

उसावरील लाल कुज हा बुरशीजन्य रोग महाराष्ट्रात कमी प्रमाणात सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्ह्यांत नव्यानेच आढळलेला होता. सध्या या रोगाचा प्रादुर्भाव राज्यात ऊस पिकामध्ये दिसून येत नसला, तरी हा रोग अतिशय महत्त्वाचा आहे. या रोगामुळे अनुकूल परिस्थितीत ऊस पिकाचे १०० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते.

रोगकारक बुरशी : कोलेटोट्रिकम फालकॅट्म प्रसार : ऊस बेणेद्वारे होतो. या रोगास उसाचा कर्करोग असेही म्हणतात. या रोगामुळे ऊस पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. तसेच रसाची शुद्धता आणि साखर उतारा यामध्ये जास्त घट संभवते. रोगाची लक्षणे पिकाच्या पानांवर तसेच कांड्यावरती दिसून येतात.

लक्षणे :

प्रामुख्याने पाने आणि कांड्यांवर दिसून येतात. सुरुवातीस पानाच्या शिरेवर वरील बाजूस लालसर रंगाचे २ ते ३ मिमी लांबीचे आणि ०.५ मिमी रुंदीचे ठिपके आढळतात. कालांतराने ठिपक्यांची लांबी वाढत जाते. त्यानंतर पाने वाळतात. रोगाची तीव्रता वाढल्यावर शेंड्याकडील सर्व पाने वाळतात. रोगट उसाची पाने वाळल्यानंतर कांड्यावर तपकिरी किंवा लालसर तपकिरी पट्टे आढळतात. कांड्या सुकतात आणि आकसून जातात. रोगग्रस्त उसाच्या कांड्याच्या आतील भाग पाहिल्यास, त्यावर लाल रंगाचे अनियमित आकाराचे ठिपके किंवा पट्टे आढळतात. कांड्यांच्या आतील भाग पोकळ होऊन त्यामध्ये कापसासारखी आणि करड्या रंगाची बुरशीची वाढ आढळून येते. कांड्याच्या आतील भागाचा वास अल्कोहोलसारखा येतो. रोगाची तीव्रता वाढल्यावर आकसलेल्या कांड्यावर काळ्या रंगाच्या असेरुलाई तयार होतात. रोगग्रस्त उसाची बेटे निस्तेज होऊन वाळतात.

नियंत्रण :बेणेमळ्यातील बेणे लागणीकरिता वापरावे. लागणीपूर्वी ऊस बेण्यास कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे १५ मिनिटे प्रक्रिया करावी. लागण केलेल्या जमिनीत पाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था करावी. रोगट बेटे खणून काढावीत व त्या ठिकाणी कार्बेन्डाझिम किंवा कॉपर ऑक्झिक्लोराईड २ ग्रॅम प्रति लिटर पाणी यापैकी एका बुरशीनाशकाचे द्रावण करून आळवणी करावी. तसेच ट्रायकोडर्मा व्हिरीडी या जैवबुरशीनाशकाचा वापर करावा. रेड रॉट झालेल्या उसाचा खोडवा न घेता त्या शेतात द्विदल धान्याचे पीक घेऊन फेरपालट करावी. पानावर रोगाची लक्षणे आढळल्यानंतर, कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने स्टीकर वापरून २ ते ३ फवारण्या कराव्यात.

वनविभागाने केली सुप्रीम कोर्टाच्या आदेशाची पायमल्ली

तात्काळ गुन्हे दाखल करा–प्रा.चव्हाण

बीड। प्रतिनिधी

शिरूर या ठिकाणी आदिवासी, वडार, भिल्ल, पारधी वस्तीवरील लोकांचे रहाते घर अज्ञात गाव गुंडाकडून जाळण्यात आले व त्याची तोडफोड करण्यात आली यामध्ये लोकांच्या घरातील संसार उपयोगी सर्व वस्तू जळून खाक झाले असून शेळ्या, कोंबड्या, बदक जळून गेले आहेत. तीस वर्षाचा संसार जिल्हा प्रशासनातल्या काही अधिकारी कर्मचाऱ्यांच्या आडमुठ्या भूमिकेमुळे उघड्यावर पडला आहे. आमदार–खासदार मंत्री पटीविधिमंडळामध्ये शपथ घेत असताना मी कुणाविषयीही ममत्व आकस भाव बाळगणार नाही शिरूर तालुक्यातील भटक्या प्रमुख त्यांची घर पाडण्यात आलेले आहेत ती घर राजकीय मंडळींच्या आदेशाने घरे पाडण्यात आलेली आहेत असा दाट संशय येतो आहे.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशान्वये वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सदस्य तथा राज्य उपाध्यक्ष प्राध्यापक किसन चव्हाण राज्य प्रवक्ते ॲट्रॉसिटी अरुण आबा जाधव जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्यासह सर्व जिल्हा तालुका कार्यकारिणी यांनी भेट देत पाहणी

केली.

बेकायदेशीररित्या घरे पाडणाऱ्या वन विभागाच्या अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करत त्यांच्यावर कड्क शासन करावे अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सदस्य तथा राज्य उपाध्यक्ष प्रा.किसन चव्हाण यांनी केली, शिरूर वस्ती जळणाऱ्या गावगुंडांचा तात्काळ शोध घ्यावा अन्? अटक करावे अशी मागणी राज्य प्रवक्ते ॲड.अरुण आबा जाधव यांनी केली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाउपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, सचिन मेघडंबर, भीमराव औसरमल, अर्जुन जवंजाळ, धम्मानंद साळवे, अंकुश जाधव,राजेशकुमार जोगदंड, विष्णू देवकाते, सम्यक विद्यार्थी आंदोलनचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, ता.अध्यक्ष दिलीप माने, किरण वाघमारे, बाळासाहेब गायकवाड, मनोहर औसरमल, लखन जोगदंड, मिलिंद सरपते, अमर ससाणे, दीपक थोरात, किशोर भोले, प्रमोद निकाळजे, राहुल शिरोळे यांच्यासह असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

शिरूर येथील घडलेली घटना अत्यंत वेदनादायी आहे. आदिवासी भिल्ल पारधी वडार यांचा वस्तीवरील घरे गावगुंडांनी जाळली त्यामध्ये मुके जनावरे, पक्षी सुद्धा जळाले इतकी क्रूर मानसिकता दिसून आली. बीड जिल्हा प्रशासनावर राजकीय दबाव तंत्राचा वापर होत आहे. त्यामुळेच तर संबंधित लोकांना ७ दिवसाच्या आत अतिक्रमण काढावे अशी नोटीस देऊन दुसऱ्याच दिवशी त्यांची घरे वन विभागाने जेसीबीद्वारे पाडली हे निषेधार्य आहे.

अजय सरवदे
जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (प)

शिक्षकांवर अध्यापना व्यतिरिक्त इतर कामाचे ओझे जास्त :डॉ. नंदकुमार उघाडे

बीड। प्रतिनिधी

कोणत्याही देशाचा सर्वांगीण विकास साक्षरतेच्या टक्केवारीवर नाही , तर साक्षरतेतील गुणोत्तर अवलंबून असतो . आपल्या देशातील साक्षरतेची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांवर अध्यापना व्यतिरिक्त लादलेली इतर कार्य कमी करणे आवश्यक आहे. असे विविध स्पर्धा परीक्षांसाठी पुस्तके लिहिणारे लेखक व ज्येष्ठ पत्रकार डॉ. नंदकुमार उघाडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. पुढे असेही म्हटले आहे की, भारतातील ढासळत चाललेल्या शैक्षणिक दर्जाबद्दल मी आजपर्यंत बऱ्याच वेळा लिहिले आहे. गेल्याच महिन्यात आपल्या शैक्षणिक क्षेत्राचा अहवाल सादर झाला आहे. त्यामध्ये असे निदर्शनास आले आहे की आठवी – नववी पर्यंत शिक्षण घेतलेल्या ६० ते ६५ टक्के विद्यार्थ्यांना बेरीज , वजाबाकी , गुणाकार , भागाकार यासारख्या गणितीय प्राथमिक क्रियाही करता येत नाहीत. इतर विषयांबद्दलचा अहवालसुद्धा गणित विषयापेक्षा फारसा वेगळा नाही. ढासळत चाललेल्या शैक्षणिक दर्जाबद्दल फक्त शिक्षकांना जबाबदार धरून चालणार नाही . शिक्षकांना अध्यापनाचे कार्य करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेणे आवश्यक आहे . यंदाच्या शैक्षणिक वर्षातील द्वितीय सत्रात सर्वच शाळांतील शिक्षक अपार आयडीच्या कामाने मेटाकुटीस आले होते. जवळपास एक महिना शिक्षक याच कामात गुंतलेले होते. विद्यार्थ्यांची नोंद ऑनलाईन असणे केव्हाही फायदेशीर आहे याबद्दल कसलेही दुमत नाही. मात्र किती वेळा ऑनलाइन नोंदणी करावी याला काही मर्यादा असायला हवी. अपार आयडी साठी शिक्षकांना पालकांशी संपर्क साधून ओटीपी ची पडताळणी करावी लागत होती . यामध्ये येणारी महत्त्वाची अडचण म्हणजे काही पालक अशेक्षित ! अशावेळी शिक्षकाची जास्तच पंचाईत ! आता परीक्षेच्या कालावधीमध्ये नियतकालिक मूल्यांकन चाचणीचे (पॅट) गुण ऑनलाइन भरावयाचे आहेत. या गुणांच्या आधारे निकाल तयार करायचा नाही. शाळेने स्वतंत्र परीक्षा घ्यायची आणि त्या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे निकाल तयार करायचा मग पॅट चा अट्टाहास कशासाठी ? शाळेचे स्वयं मूल्यांकन यामध्ये १२८ मानक दिलेले आहेत. यामध्ये किती आवश्यक आणि किती अनावश्यक याबद्दल मी येथे नमूद करत नाही. यामध्ये क्रीडा , संगीत , चित्रकला याबद्दलही माहिती भरावयाची आहे. गेल्या दहा वर्षात शासनाने किती क्रीडा , संगीत व चित्रकला शिक्षकांची भरती केली आहे हा प्रश्नही पडतो . नवीन संच मान्यतेनुसार २० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असणाऱ्या शाळा बंद करावयाच्या आहेत. ग्रामीण व दुर्गम भागात अनेक लहान लहान खेडी आहेत त्या ठिकाणी २० पेक्षा कमी विद्यार्थी आहेत अशा ठिकाणची शाळा बंद झाली तर बाजूच्या गावातील शाळा किमान दोन किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावर आहे.

धार्मिक क्षेत्रातील खोटेपणा घालवणे हे धर्मचे कार्य– परशुराम महाराज मराडे

बीड । प्रतिनिधी

धार्मिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात खोटेपणा आढळून येतो. अनेक संधी साधू लोक यामध्ये घुसतात, धर्माला गालबोट लावतात. अशा खोटारड्या लोकांचं खोटेपणा उघडा करून तो घालवणे हे धर्माचं अस्सल कार्य असल्याचे प्रतिपादन जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिराचे संस्थापक प्राचार्य परशुराम महाराज मराडे यांनी केले. येथील मंदिरामध्ये जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या बीज सोहळ्याच्या निमित्ताने सहाव्या कीर्तनामध्ये ते बोलत होते. त्यांनी कीर्तनासाठी संत तुकाराम महाराजांचा 'धर्माचे पालन करणे पाखंड खंडन' हा अभंग निवडला होता. पुढे बोलताना ते म्हणाले की संत

तुकाराम महाराज आणि सकळ संतांनी नामस्मरण हा एकमेव उद्धाराचा मार्ग सांगितलेला आहे. त्याचे बीज आम्हाला वाढवायचा आहे. हे करत असताना आम्हाला अनेक वेळा तीक्ष्ण स्वरूपाची भाषा वापरावी लागते. संत कोणाची भीड भाड बाळगत नाहीत असेही ते म्हणाले. आम्ही अनेक वेळा विटाळ सोवळे–ओवळे, सुतक या गोष्टी पाळतो परंतु खऱ्या अर्थानं इतरांच्या स्त्रियांना मातेसमान समजणं, इतरांच्या धनाची अभिलाषा न बाळगणं हा खरा विटाळ आहे. 'परद्रव्य, परणारी यांचा धरी विटाळ' असे त्यांनी प्रबोधन केले. धर्माच्या नावाने अनेक अधार्मिक गोष्टी केल्या जातात. त्याचा मोठ्या प्रमाणात व्यापार केला जातो. लोक त्या व्यापारामध्ये भुलून जातात. ते सत्य धर्मापर्यंत कधीही पोहोचत नाहीत. यामुळे धार्मिक क्षेत्राची अतोनात अधोगती होत असल्याचे ते म्हणाले. कीर्तनासाठी दत्तात्रय महाराज बहिर, भाऊसाहेब महाराज धांडे, श्रीकृष्ण महाराज उबाळे, संतोष महाराज डोंगरे, राजाराम महाराज घोलप, मच्छिंद्र महाराज गोरे यांच्यासह बीड, तळेगाव, काकडहिरा व परिसरातील भाविकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अबू असीम आझमी यांचे निलंबन रद्द करून झेड प्लस सुरक्षा द्या – नवीदोद्दीन सिद्दिकी

माजलगाव । प्रतिनिधी

समाजवादी पार्टीचे आमदार व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अबु आसिम आझमी यांचे निलंबन रद्द करून झेड प्लस सुरक्षा देण्यात यावी अशी मागणी पक्षाचे माजलगाव तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी यांनी तहसीलदार यांच्यामार्फत महाराष्ट्राचे राज्यपाल यांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

याविषयी पाठविलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, समाजवादी पार्टी चे आमदार व समाजवादी पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अबु आसिम आझमी यांना महाराष्ट्र विधानसभेच्या चालु

अर्थसंकल्पीय अधिवेशनात औरंगजेब यांचे उदात्तीकरण केल्याच्या खोट्या आरोपावरून असंवैधानिकरित्या निलंबन करण्यात आले आहे. त्यांच्यावर छत्रपती संभाजी महाराज यांचे अवमान केल्याचा ठपका ठेवून मनमानी पद्धतीने त्यांचे निलंबन करण्यात आले आहे. अबु आसिम आझमी नेहमी देशहित पाहणारे व गोर–गरीबांना मदत करणारे आमदार आहेत. नेहमी सत्ताच्या बाजुने उभे राहणारे लोकप्रतिनिधी असून त्यांच्यावर खोटे आरोप ठेवून त्यांना निलंबित करणे अयोग्य आहे. तसेच वरील प्रकरणी त्यांना जिवे ठार मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत, म्हणून त्यांना झेड प्लस सुरक्षा देण्याची गरज आहे. म्हणून माजलगाव समाजवादी पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते या नात्याने माजलगाव तहसीलदार यांच्यामार्फत महाराष्ट्राचे राज्यपाल यांना पाठवलेल्या निवेदनातून लवकरात लवकर अबु आसिम आझमी यांचे निलंबन रद्द करून त्यांना झेड प्लस सुरक्षा देण्यात यावी. अशी मागणी समाजवादी पार्टीचे माजलगाव तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी आणि कार्यकर्त्यांनी केली आहे.

आश्लेषा विनोद वाकडे बनली ड्रोन पायलट

बीड । प्रतिनिधी

सौ.के.एस. के. (काकू) कृषि महाविद्यालय बीड येथील विद्यार्थिनी अश्लेषा विनोद वाकड़े ही ड्रोन पायलट बनली आहे. महाविद्यालयात कृषीचे शिक्षण घेत असतानाच समाजसेवेची आवड असल्यामुळे समाज उपयोगी कही करायचे ह्या विचाराने प्रेरित झाल्यामुळे आणि चिकित्सक बुद्धि ह्यद्वारे ड्रोन बद्दलचे शिक्षण घेऊन ड्रोन पायलट हे नाव साकार केले.

कृषीमध्ये यांत्रिकीकरणाचा वापर वाढविणेकरिता केंद्र व राज्य शासन विविध योजनांच्या माध्यमातून प्रोत्साहनात्मक अनुदान देत आहे. ड्रोनव्दारे विविध खरिप, रब्बी, फळपिके तसेच भाजीपाला पिकावर किटकनाशकाची फवारणी सुलभरित्या करता येते. मात्र, योग्यरित्या ड्रोन चालवू शकतील, असे प्रशिक्षित मनुष्यबळ पुरेशा प्रमाणात आज उपलब्ध नाही. ह्याच गोष्टीचा विचार करुन सौ. के. एस. के. (काकू) कृषि महाविद्यालय, बीड येथील विद्यार्थिनी अश्लेषा विनोद वाकडे हिने छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे प्रायोजित महात्मा फुले कृषी राहुरी विद्यापीठ अंतर्गत रिमोट पायलट प्रशिक्षण संस्थेमार्फत ड्रोन पायलट प्रशिक्षण पुर्ण करुन रिमोट पायलट प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. प्रशिक्षण प्राप्त करुन न थांबता या विद्यार्थ्यांनीने परिसरातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून शेती मध्ये ड्रोन द्वारे फवारणी करण्यासाठी ड्रोन खरेदी केले आहे. एवढ्या वर च न थंबता त्यांच्या परिसरातील आणि महाविद्यालयतिल विद्यार्थ्यांना त्यांच्या ड्रोन पायलट ह्या विषयी असलेले मार्गदर्शन करुन अजुन ड्रोन वपरबद्दल जनजागृति घडवयाचा त्यांच्या मानस आहे आणि त्यांच्या ड्रोन विषयी असलेल्या माहिती च्या आधारे शेती मध्ये नवीन वापरून कमी ख़र्चत जास्त उतपन्न कसे घडेल ह्यबद्दल त्यांच्या परिसरातील शेतकऱ्यांना लाभ व्हावा ह्यसाठी पुढाकार घेण्याचा त्यांच संकल्प आहे. त्यांच्या ह्या यश मध्ये त्यांना महाविद्यालय चे जी.ही .साळुंके सर तसेचं मुख्याध्यापक एस .पी .मोरे सर मार्गदर्शन लाभले.

डॉ. सतीश साळुंके यांना हिंदी राज्यनाट्य अंतिम स्पर्धेत अभिनयाचे बक्षीस

बीड । प्रतिनिधी

पुणे नागपूर व मुंबई या संयुक्त केंद्रात महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीने आयोजित ६३ व्या महाराष्ट्र राज्य हिंदी नाट्य स्पर्धेत प्रसिद्ध रंगकर्मी डॉ. सतीश साळुंके यांना ' बिहाइंड दी कर्टन' या नाटकातील अप्रतिम अभिनयाबद्दल विशेष गुणवत्ता अभिनय बक्षीस पटकावले. हिंदी नाट्य स्पर्धेत बीडच्या कलावंताला प्रथमच असे बक्षीस मिळाले. डॉ. सतीश साळुंके लिखित व दिग्दर्शित 'बिहाइंड दी कर्टन' हे नाटक नुकतेच मुंबईच्या साहित्य संघ या नाट्यगृहात झाले. या स्पर्धेत महाराष्ट्रातून ५८ नाटकातून शेकडो कलावंतांनी सहभाग घेतला होता. पुणे नागपूर व मुंबई या ठिकाणी या स्पर्धा पार पडल्या. परिवर्तन प्रतिष्ठान बीडच्या वतीने प्रस्तुत नाटक मुंबई केंद्रावर झाले. त्यात प्रा सुधाकर विश्वमित्रेच्या भूमिकेबद्दल डॉ. सतीश साळुंके यांनी अभिनयाचे बक्षीस पटकावले. विशेष म्हणजे याच भूमिकेसाठी त्यांना गतवर्षी मराठी राज्य नाट्य स्पर्धेतही बक्षीस मिळाले होते.

डॉ. साळुंके यांनी आत्ता पर्यंत तीस एकांकिका, बारा स्वतंत्र नाटके, एकोणिस बालनाटक तसेच बीड जिल्ह्याच्या इतिहासावर चार ग्रंथ लिहिले असून 'मराठवाड्याची नाट्य परंपरा' हा हजार पानांचा बृहतग्रंथ महाराष्ट्रात नाट्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात गौरविल्या गेला आहे. त्यांच्या विविध दहा पुस्तकांना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे ही पुरस्कार लाभले आहेत. २००४ साली त्यांना भारत सरकारने तत्कालीन राष्ट्रपती आदरणीय एपीजे अब्दुल कलाम यांच्या हस्ते राष्ट्रपती पुरस्कार देऊन गौरवले होते. परिवर्तन प्रतिष्ठानच्या माध्यमातून डॉ. साळुंके यांच्या अनेक विद्यार्थी कलावंतांना अभिनयाची रौप्यपदके व दिग्दर्शन, संगीत, प्रकाशयोजना, नेपथ्याची बक्षिसे राज्यस्तरावर मिळाले आहेत. 'बिहाइंड दी कर्टन' या नाटकात उल्का कुलकर्णी, डॉ. गणेश शिंदे, प्रा तन्मय शेटगार, मुकुंद धुताडमल, प्रा. प्रवीण निसर्गंध, अण्णासाहेब गडदे या कलावंतांनी भाग घेतला या नाटकाचे नेपथ्य नितीन धायगुडे यांनी केले तर प्रथमेश खडकीकर यांनी संगीत संयोजन केले. विनोद राठोड यांनी प्रकाशयोजना केली. नाटकाची रंगभूषा आणि वेशभूषा सौ. सुधा साळुंके यांनी केली. नाटकासाठी दीपक कोरडे, डॉ. शिंदे, मुकुंद धुताडमल प्रा. निसर्गंध यांनी विशेष सहकार्य केले. समाजातील तथाकथित प्रतिष्ठित व्यक्ती, विचारवंत, साहित्यिक, नाटककार जसे लिहीतात व बोलतात, जनतेला उपदेश करतात पण प्रत्यक्ष जीवनात मात्र त्यांचे आचरण नेमके त्याच्याविरुद्ध असते. नाटकाला विशेष सहकार्य केल्याबद्दल परिवर्तन तर्फे प्रसिद्ध विधीज्ञ संस्कार विद्यालयाचे सचिव मा. कालिदासराव थिगळे यांचे आभार मानण्यात आले. पडद्यामागे ही माणसं कमालीची बेगडी बनावटी असतात या विचारांवर आधारित 'बिहाइंड दी कर्टन' हे नाटक परिवर्तन तर्फे हिंदी भाषेत सादर केले होते. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. या निमित्ताने बीडच्या रंगभूमीची चमक मुंबईच्या जाणकार प्रेक्षकांना पाहायला मिळाली.

जाहीर प्रगटन

मा. श्रीमती पी डी चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज ४५२/२०२५

ॲड. बी बी घुमरे

विठाबाई भ्र. महादेव तांदळे व इतर विरुध्द निरंक

अर्जदार : १. विठाबाई भ्र. महादेव तांदळे, वय–८५, वर्षे, धंदा–घरकाम, रा. तांदळयाची वाडी, ता. जि. बीड,२. आश्रुबा पि. महादेव तांदळे, वय–५२, वर्षे, धंदा–शेती, रा. तांदळयाची वाडी, ता. जि. बीड, ३. कुसुमबाई भ्र. नवनाथ मोराळे, वय–६४, वर्षे, धंदा–घरकाम, रा. दहिफळ (वड), ता. केज, जि. बीड , ४. लक्ष्मीबाई भ्र. कोंडीबा सिरसट, वय–५४, वर्षे, धंदा–घरकाम, रा. वडगाव (क), ता. जि. बीड, ५. चींगुबाई महादेव तांदळे, वय–४२, वर्षे, धंदा–घरकाम, रा. तांदळयाची वाडी, ता. जि. बीड, ६. काशीबाई भ्र. सुनिल पाळवदे, वय–३८, वर्षे, धंदा–घरकाम, रा.सासुरा, ता. केज, जि. बीड

(अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत महादेव यदा तांदळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत महादेव यदा तांदळे यांचा मृत्यु दिनांक ०८.०३.२०१९ रोजी तांदळयाची वाडी. ता. जि.बीड येथे झाला असुन अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क्र. ३ ते ६ या मयताच्या मुली आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत महादेव यदा तांदळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३ मार्च २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९ एप्रिल २०२५.

स्वाक्षरित
क लिपीक

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

भगवंताच्या नामस्मरणाच्या रंगात रंगून जा–साळुंके

बीड । प्रतिनिधी

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या बीज उत्सवानिमित्त खर्डेवाडी येथे श्रीमद संगीत भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा व त्रिदिवसीय कीर्तन महोत्सवातील पहिल्या दिवशीच्या सेवेमध्ये भरत साळुंके महाराजांनी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा रंगी रंगला श्रीरंग हा अभंग घेतला होता या अभंगावर भाष्य करताना भरत महाराज म्हणाले की मानवी जीवन जगत असताना इतर कुठल्याही नश्वर रंगाच्या पाठीमागे लागून रंगण्यापेक्षा भगवंताची तन–मन–धनाने भक्ती करून ईश्वराच्या रंगांमध्ये रंगून जा यामुळे आपल्या जीवनाचे

सार्थक होईल असा अनमोल सल्ला महाराजांनी आपल्या प्रथम सेवेच्या पुष्प गुंफतांना व्यक्त केले

सविस्तर चिंतनामध्ये महाराजांनी सांगितले की आपले पत्नी, मुले, धनदौलत ही नष्ट होणारी आहे कधीही न चोरी जाणार धन म्हणजे परमार्थ परमार्थ महाजन जोडी देवाची चरण सेवा होय आपल्या हाताने केलेले दान आणि स्वतः केलेलं भगवंताचे चिंतन म्हणून हे वाया जात नाही शेवटच्या घडीला फक्त आणि फक्त देवाचंच नाम कामी येतं असं महाराज म्हणाले या कीर्तन सेवेसाठी ज्ञानराज वारकरी शिक्षण संस्था मंठाचे ह भ प व गायक स्वर सम्राट परमेश्वर महाराज आतकरीआणि उत्कृष्ट पखवाज वादक अंकुश महाराज खराबे हे उपस्थित होते कीर्तन श्रवण करण्यासाठी परिसरातील भावीकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. किर्तन सेवेनंतर कळेकर परिवाराच्यावतीने महाराज मंडळी यांचा सन्मान करण्यात आला.

पायी दिंडी सोहळ्याचे श्रीसंत एकनाथ महाराज षष्ठीनिमित्त प्रस्थान

लिंबागणेश । प्रतिनिधी

श्री गुरू ईश्वर बाबा भारती श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे श्रीसंत शांती ब्रम्ह एकनाथ महाराज षष्ठी निमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन मठाधिपती ह.भ.प.महादेव बाबा भारती महाराज आणि ह.भ.प. शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. काल दि.१४ शुक्रवार रोजी सकाळी श्रीक्षेत्र बेलेश्वर व श्रीगुरु ईश्वर बाबा भारती यांचा अभिषेक करून पायी दिंडीचे प्रस्थान झाले.पायीदिंडींचे हे ११ वे वर्ष असुन मोठ्या संख्येने भाविक

यात सहभागी झाले आहेत.

टाळ मृदंगाच्या गजरात '' ग्यानबा तुकाराम'' च्या नामघोषात दंग दिंडीतील भाविकांचे दिंडी मार्गावरील भाविकांनी आकर्षक फुलांनी सजवलेल्या रथामध्ये विराजमान महंत महादेव भारती महाराज व शांती ब्रम्ह तुकाराम महाराज यांची ठिकठिकाणी आतषबाजी करत, सडासमार्जन, रांगोळी काढून सुवासिनींनी पाद्यपुजन करत औक्षण करत मनोभावे स्वागत केले. ग्रामस्थांनी दिंडीतील भाविकांची ठिकठिकाणी चहा पाणी,लिंबु सरबत,नाष्टा यांची सोय करण्यात आली होती.काल दुपारच्या भोजणाची पंगत पिंपरनई ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली होती. त्यानंतर पायी दिंडी मुक्कामी बेलखंडी गावाकडे मार्गस्थ झाली. पायी दिंडी सोहळा १४ मार्च ते २२ मार्च दरम्यान होत असुन पायीदिंडी बेलखंडी,बेलुरा, फुल सांगवी, अर्धपिंपरी, मुंगी, याठिकाणीहुन मार्गक्रमण करत दि.२१ मार्च रोजी पैठण येथे मुक्कामी पोहोचणार आहे.दि.२२ मार्च रोजी ह.भ.प. शांतीब्रम्ह तुकाराम महाराज बेलेश्वर संस्थान बेलगाव यांच्या काल्याच्या किर्तनाने सोहळ्याची सांगता होणार आहे.

नाथषष्ठी सोहळ्यात भजन, किर्तन,भारूड, संगीत भजन आदी कार्यक्रमांची मेजवानी असते. भाविकांच्या जेवणाची आणि मोफत जेवणाची सोय संस्थानच्या वतीने केली जाते.शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या अथक प्रयत्नाने पायी दिंडी सोहळ्याला वेगळे स्वरूप आले असुन पायीदिंडीत सहभागी होणाऱ्या पंचक्रोशीतील भाविकांचा सहभाग उत्तरोत्तर वाढत आहे.

एजंटगिरी खपवून घेणार नाही

आमसभेत अधिकाऱ्यांना आ.सुरेश धस यांच्या कडक सूचना

आष्टी । प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षात आष्टी मतदार संघातील कोणत्या योजनेचा लाभ घ्यायचा असेल तर प्रस्ताव बनवण्यापासून शिक्का मारेपर्यंत यांची साखळी तयार झाली ही बंद करून आता कोणत्याही शासकीय कार्यालयात वैयक्तिक लाभासाठी कोणाकडूनही पैसे घेतले तर कोणत्याच अधिकाऱ्यांची गैर केली जाणार नाही जर कोणी अधिकारी पैसे मागताना आढळून आला तर त्याची गाठ माझ्याशी असल्याचे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी आष्टीच्या आमसभेत केले गेल्या सात वर्षानंतर पहिल्यांदाच आष्टी पंचायत समितीच्या प्रांगणात शनिवारी १५ रोजी सकाळी साडेअकरा वाजता आयोजित करण्यात आलेली आमसभा या आमसभेच्या अध्यक्ष स्थानावरून आमदार दस बोलत होते यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर उपविगय अधिकारी व सीमा शेख तहसीलदार वैशाली पाटील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रामजान तांबोळी नगराध्यक्ष जीआबेक सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे माजी पंचायत समिती सभापती बद्रीनाथ जगताप यांची गरजे परमेश्वर शेळके यांच्यासह अन्य मानेवर व्यासपीठावर उपस्थित होते



आमदार दस पुढे बोलताना म्हणाले की जनतेने खूप दिवसापासून रखडलेले कामे असून न्याय ज्यांना मिळाला नाही त्यांना न्याय मिळवून देण्याकडे देण्यासाठी या आमसभेचे आयोजन करण्यात आले आहे या आमसभेत दलित आदिवासी पारधी या सह रमाई आवास योजनेच्या कामे कुणीही अडवू नका तसेच अंगणवाडी शाळा खोली कामे आडू नका ज्या कार्यालयात जागा रिक्त असेल त्या जागेची माहिती देऊन रिक्त जागा भरण्यात येतील ३२९५ विरुद्ध करण्यात यावे असा आदेश देखील गट विकास अधिकारी यांना आमदार दास यांनी दिला तसेच गाय गोठाच्या बाबतीत जे गाव्यातील शोषित गावात प्रामुख्याने मोडली जातात अशांना मंजुरी करावे अशी सूचना आमदार दास यांनी कटीगस अधिकाऱ्यांना दिली तसेच माझ्या कार्यकाळात मला कुठलीही कामाबाबतीची दिरंगाई चालणार नाही ज्यांना काम करायचे असेल त्यांनी या ठिकाणी आपली शासकीय सेवा करावी ज्यांना नाही जमणार त्यांनी बाहेरचा रस्ता पकडावा

माजी आमदार साहेबराव दरेकर म्हणाले की प्रत्येक गावचे तलाठी ग्रामसेवक यांनी सजावर उपलब्ध राहणे हे कायद्याने बंधनकारक असते मात्र असे होत नाही त्यामुळे लोकांना अनेक गोष्टींना तोंड देऊन त्रास सहन करावा लागत आहे तलावातील पाणी पुढील दुष्काळी धाकता ओळखून राखून ठेवावे तसेच साबलखेड आष्टी रस्त्याचे काम लवकरच पूर्ण करावे या रस्त्यावरील धुळीमुळे अनेकांना श्वसनाचे आजार जळण्याची दाट शक्यता असल्याचेही दरेकरांनी खंत ◀◀ पान ३ वर

जोगाईवाडी येथे रोटरीने बांधलेल्या अमरधाम स्मशानभूमीचे लोकार्पण

धावडी शिवारात बांधलेल्या बंधाऱ्याचे लोकार्पण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाईच्या वतीने रोटरी आर.सी.सी.अंतर्गत तालुक्यातील जोगाईवाडी येथे ग्रामपंचायत व रोटरी क्लब यांच्या वतीने बांधण्यात आलेल्या अमरधाम या स्मशानभूमीचा लोकार्पण व तालुक्यातील धावडी येथे वॉटर ॲन्ड सॅनेटेशन प्रकल्पातर्गंत तयार करण्यात आलेल्या बंधार्याचे लोकार्पण सोहळा रविवारी झाला.

या लोकार्पण सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून रोटरीचे प्रांतपाल सुरेश साबु, उपप्रांतपाल हेमंत रामढवे, भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडा, जोगाईवाडीच्या सरपंच मनिषा बाळासाहेब तोडतले, ग्रामविकास अधिकारी बी.डी.जामळे, रोटरीचे अध्यक्ष ◀◀ पान ३ वर

शिरूर येथील अतिक्रमित घरे वनविभागाने पाडली अन् गावगुंडांनी जाळले-अजय सरवदे

वंचितचे शिष्टमंडळाने शिरूरमधील घटनास्थळाची केली पाहणी

बीड । प्रतिनिधी

शिरूर या ठिकाणी आदिवासी, वडार, भिल्ल, पारधी वस्तीवरील लोकांचे रहाते घर अज्ञात गाव गुंडाकडून जाळण्यात आले व त्याची तोडफोड करण्यात आली यामध्ये लोकांच्या घरातील संसार उपयोगी सर्व वस्तू जळून खाक झाले असून शेळ्या, कोंबड्या, बदक जळून गेले आहेत. तीस वर्षाचा संसार जिल्हा प्रशासनातल्या काही

अधिकारी कर्मचाऱ्यांच्या आडमुठ्या भूमिकेमुळे उघड्यावर पडला आहे. आमदार-खासदार मंत्री पटीविधिमंडळामध्ये शपथ घेत असताना मी कुणाविषयीही ममत्व आकस भाव बाळगणार नाही शिरूर तालुक्यातील भटक्या प्रमुख त्यांची घर पाडण्यात आलेले आहेत ती घर राजकीय मंडळींच्या आदेशाने घरे पाडण्यात आलेली आहेत असा दाट संशय येतो आहे. ◀◀ पान ३ वर

श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनची पायी दिंडी भक्तीमय वातावरणात पैठणकडे मार्गस्थ

पिंपळवंडी । प्रतिनिधी

श्री.संत एकनाथ महाराज एकनाथ षष्ठी पैठण प्रित्यर्थ प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर ते श्री क्षेत्र पैठण पायी दिंडी दि.१५ मार्च २०२५ शनिवार रोजी मठाधिपती महंत गुरुवर्य स्वामी ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या भक्तीमय वातावरणात व उत्साहात पैठणकडे मार्गस्थ झाली.सजवलेल्या भव्य-दिव्य पालखी रथातून महादेव- पार्वतीची मूर्तीची श्री क्षेत्र अश्वत्थलिंग देवालयापासून पिंपळवंडी गावात बँड पथक,भगवे झेंडे,पताकेधारी वारकरी, टाळकरी,भाविक-भक्त मोठ्या संख्येने सहभागी होऊन भानुदास-एकनाथ नामघोष करीत आगमन झाल्यानंतर ग्रामस्थांनी महंत महादेवानंद भारती महाराज व पायी दिंडीचे भव्य स्वागत केले.येथील हनुमान मंदिरासमोर पायी दिंडीतील वारकऱ्यांना चहा पाणी व नाश्ता

देण्यात आला व पायी दिंडी पैठणकडे मार्गस्थ झाली.या पायी दिंडी समवेत ह.भ.प.परमानंद भारती महाराज,ह.भ.प.शिवानंद भारती महाराज,ह.भ.प.नारायण महाराज बुजगुडे तसेच भाऊसाहेब भवर आदीसह पंचक्रोशीतील भाविक-भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

दुर्गाबाई जाब्रस यांचे निधन

माजलगाव । प्रतिनीधी

शहरातील झेंडा चौक भागातील रहिवासी असलेल्या सौ.दुर्गाबाई चंद्रकांतराव जाब्रस वय ७५ वर्षे यांचे वृद्धापकाळाने दि. १४ मार्च शुक्रवार रोजी पहाटे निधन झाले.

सौ.दुर्गाबाई जाब्रस या अतिशय प्रेमळ व शांत स्वभावाच्या असल्याने त्या सर्व परिचित होत्या. त्यांच्या निधनाने हळहळ करण्यात येत आहे.त्यांच्या पार्थिव देहावर सिंदफना नदी तीरावर असलेल्या स्मशानभूमीत दि १४ मार्च शुक्रवार रोजी सायंकाळी ४:३० वाजण्याच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, चार मुले सुना, नातवंडे असा परिवार आहे. एल.आय.सी चे विकास अधिकारी जयेश जाब्रस, पत्रकार कमलेश जाब्रस,महेश जाब्रस,निलेश जाब्रस यांच्या त्या मातोश्री होत.

उंदरखेल येथील वामन वस्तीवर भरदिवसा घरफोडी!

२० तोळे सोन्यासह रोकड लंपास;अंभोरा ठाणे हद्दीतील घटना

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील उंदरखेल येथील वामन वस्तीवरील दोन सख्खा भावंडाचे शेजारी शेजारी घरे आहेत. शेतात काम करत असताना शनिवारी भरदिवसा अज्ञात चोरट्यानी घरफोडी करून २० तोळे सोन्यासह रोकड चोरीला गेल्याची घटना घडली.

आष्टी तालुक्यातील उंदरखेल येथील वामन वस्तीवर सुनिल विठ्ठल वामन,बाबासाहेब विठ्ठल वामन या दोन भावंडे शनिवारी सकाळी घराला लागूनच

असलेल्या शेतात ते काम करत असताना भरदिवसा अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून सुनिल वामन याच्या दिवाणमधील तेरा तोळे तर बाबासाहेब याच्या दिवाणमधील सहा तोळे असे दोन भावडांच्या घरातील २० तोळे सोन्यासह रोख रक्कम असा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. घटनास्थळी अंभोरा पोलिस ठाण्याचे ठाणेदार मंगेश साळवे ◀◀ पान ३ वर

तातडीने तपास करण्याची मागणी

ठाणे हद्दीत भरदिवसा मोठी घरफोडी झाल्याची घटना घडली असुन नागरिक भयभीत झाले आहेत.या घरफोडीचा अंभोरा पोलिसांनी तातडीने तपास करावा अशी मागणी उंदरखेल येथील उपसरपंच सागर शेकडे यांनी केली आहे.

शेतकरी संघटनेच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींचा सन्मान सोहळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शेतकऱ्यांने आत्महत्या केल्या नंतर त्याच्या विधवा पत्नीचा संघर्ष सुरू होतो.ऐन तारुण्यात पतीचे निधन झाल्यामुळे घरातील माणसे आधार देतीलचं अशी परिस्थिती नसते.गरिबी आणि सामाजिक वातावरणाला तोंड देवून मुलाबाळांचे शिक्षण आणि संगोपन करणाऱ्या, धैर्यवान शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींचा साडी चोळी देवून शेतकरी संघटनेच्या वतीने सन्मान करण्यात येणार आहे.१९ मार्च २०२५ रोजी,बुधवारी, दुपारी १ वाजता, मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह,अंबाजोगाई जि.बीड येथे हा कार्यक्रम आयोजित केला आहे.अशी माहिती शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष तथा भारतीय किसान संघ परिसंघ,नवी दिल्लीचे सचिव कालिदास आपेट यांनी दिली.

शेतकरी संघटनेचे संस्थापक शरद जोशी यांनी साहेबराव करपे पाटील आणि मालती करपेंनी मुलाबाळासह १९ मार्च १९८६ रोजी केलेल्या सामुदायिक आत्महत्येची तत्कालीन सरकारला नोंद घ्यायला भाग पाडले.आता या घटनेला ३९ वर्ष पूर्ण झाली आहेत.तरिही दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्या वाढतच आहेत. सन २०१४ ते २०२४ या दहा वर्षाच्या काळात बीड जिल्ह्यात २४३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून जीवन संपविले आहे.या दहा वर्षाच्या काळात पंकजाताई आणि धनंजय मुंडे हे बहिण-भाऊ बीडचे पालकमंत्री होते.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी बीडचे पालकमंत्री झाल्यापासून सुमारे ५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो ऑफ पोलीसच्या माहितीनुसार देशभरात दररोज सुमारे ४५ शेतकरी आत्महत्या करतात.तर महाराष्ट्रात दररोज सुमारे १५ शेतकरी आत्महत्या करुन मृत्यूला कवटाळतात.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींनी ◀◀ पान ३ वर

हाती काम आणि मुखी भगवंताचे नाम घ्या; जीवनाचा उद्धार होईल! -बबीताताई बोडखे

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. विविध जाती धर्म, पंथांच्या विविध संतांनी प्रचंड त्रास सहन करत या देशात समता,बंधुत्व, ऐक्य आणि सर्वधर्मसमभाव ही मूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला वारकरी संप्रदाय सर्वश्रेष्ठ असून मनुष्याने '' हाती काम आणि मुखी भगवंताचे नाम '' घेतल्यास जीवनाचा नक्की उद्धार होईल..! असा ठाम विश्वास प्रवचनकार ह.भ.प. सौ.बबीताताई बोडखे

महाराज यांनी आज येथे व्यक्त केला.

जामखेड तालुक्यातील भवरवाडी येथे शिवपुराण कथा व आरोग्य महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह प्रसंगी प्रवचन सेवेत ह.भ.प.सौ. बबीताताई बोडखे महाराज यांनी संत ज्ञानेश्वरांच्या अनेक दृष्टांतांचा उहापोह सविस्तर व सर्वसामान्यांच्या भाषेत करून उपस्थित भाविक भक्तांना अंतर्मुख केले.प्रारंभी गावकऱ्यांच्या ◀◀ पान ३ वर

माजलगावात बहुजन नायक कांशीराम यांची जयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

बहुजन समाज पार्टीचे संस्थापक आणि बहुजन नायक कांशीराम यांची जयंती दि १५ मार्च शनिवार रोजी साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.संजय बागुल हे उपस्थित होते.तर अध्यक्षस्थानी अशोका कांबळे हे होते.या प्रसंगी प्रा.संजय बागुल यांनी बहुजन नायक मान्यवर कांशीराम यांनी १९८४ मध्ये बहुजन समाज पार्टीची स्थापना केली,ज्याचा मुख्य उद्देश

समाजातील शोषित आणि वंचित वर्गाचे हक्क राखणे होता. त्यांच्या कष्ट आणि समर्पणामुळे मायावतीसारख्या नेत्यांना चार वेळा मुख्यमंत्री पदावर पोहोचण्याची संधी मिळाली.कांशीराम यांच्या संघर्षाने लाखो लोकांना प्रेरणा दिली आहे आणि त्यांचे योगदान भारतीय समाजात महत्त्वपूर्ण आहे.असे प्रतिपादन केले.

या वेळी बामसेफ चे रमेश जाधव, ◀◀ पान ३ वर

आष्टी येथे २३ मार्चला मराठा वधू-वर मेळावा

आष्टी । प्रतिनिधी

मराठा सेवा संघ आष्टी तालुका यांच्या मार्गदर्शनातून सगेसोयरे वधू-वर सेवा केंद्राच्या वतीने आष्टी जिल्हा बीड येथे मराठा समाज वधु-वरांसाठी रविवार दि. २३ मार्च २०२५ रोजी जोगेश्वरी मंगल कार्यालय,खडकत रोड, आष्टी जि.बीड येथे मराठा वधू-वर परिचय महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.तरी मराठा समाजातील विवाहइच्छुक वधु-वरांनी मोठ्या संख्येने आपली नाव नोंदणी करून हा मेळावा यशस्वी करावा, असे आवाहन सगेसोयरे वधु-वर सेवा केंद्रांचे हरीभाऊ जगताप पाटील, मुख्य ग्रुप ॲडमिन शिवाजीराव निकम, किसनराव वाळेकर, बाळासाहेब गायकवाड व मराठा सेवा संघाच्या कार्यकारिणी मंडळाने केले आहे. या महामेळाव्यात मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष उद्योजक शिवश्री, इंजि, तानाजी (बापु) जंजिरे ,मराठा वधु-वर सुचक कक्षाचे , जेष्ठ पत्रकार सीताराम ◀◀ पान ३ वर

आजच्या धनगर समाज वधू- वर परिचय मेळाव्यास उपस्थित रहा- उकांडे,महारनवर

पिंपळवंडी । प्रतिनिधी

राजे मल्हारराव होळकर सामाजिक प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने आज दि.१६ मार्च २०२५ रविवार रोजी संपन्न होत असलेल्या धनगर समाजाच्या राज्यस्तरीय वधु- वर परिचय मेळाव्यास महाराष्ट्रसह बीड जिल्ह्यातील सर्व समाज बांधव, महिला,विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कोतन येथील सामाजिक कार्यकर्ते आसाराम महारनवर व पत्रकार बबनराव उकांडे यांनी केले आहे.

राजे मल्हारराव होळकर सामाजिक प्रतिष्ठान बीड आयोजित धनगर समाजाच्या राज्यस्तरीय वधु- वर परिचय मेळावा २०२५ हा सातवा आहे.संत भगवान बाबा प्रतिष्ठान बार्शी रोड बीड या ठिकाणी आज रविवार दि.१६ रोजी सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.मेळाव्याचे उद्घाटक म्हणून प्राध्यापक यशपाल भिंगे अध्यक्ष मौर्या प्रतिष्ठान नांदेड व मुरहरी केळे माजी संचालक विद्युत वितरण कंपनी मुंबई तथा संत साहित्याचे अभ्यासक तसेच ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

निमगाव केतकीत दोन गटांत मारामारी; एकूण ११ जणांवर परस्परविरोधी गुन्हे

इंदापूर । प्रतिनिधी

तालुक्यातील निमगाव केतकी दोन गटांमध्ये वेगवेगळ्या कारणांवरून झालेल्या मारामारी प्रकरणी दोन्ही गटातील एकूण ११ जणांवर परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

यामध्ये शंकर भोंग (वय ३७) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शुक्रवार (दि.१४) सकाळी साडेदहाच्या सुमारास निमगाव केतकी हद्दीत इंदापूर रस्त्यावर जय कुदळे, दिनेश शेंडे,दादा भोंग, सुरज पिसे, ओमकार राउत यांच्या कारने आदल्या दिवशी झालेल्या किरकोळ वादातून फिर्यादीची बुलेट अडवली. त्यानंतर आरोपींनी हाताने व लाथा-बुक्क्यांनी त्यांना मारहाण केली. या वेळी जय कुदळे याने धारदार चाकूने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या अंगठ्याजवळील बोटावर वार करून बोट नखाजवळून कट होऊन फॅक्चर झाले. त्याच वेळी दिनेश शेंडे याने फिर्यादीच्या गळ्यातील पाच तोळ्यांची सोन्याची चेन काढून घेतली व 'पुन्हा आमच्या नादाला लागला तर तुला मारूनच टाकतो,' अशी धमकी देऊन पसार झाले. यावरून जय कुदळे, दिनेश शेंडे, दादा भोंग, सुरज पिसे व ओमकार राउत (सर्व रा.निमगाव केतकी) यांच्या विरोधात इंदापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तर दादासो मधुकर भोंग (वय २७) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शुक्रवारी (दि.१४) सकाळी साडेदहाच्या सुमारास निमगाव केतकी येथील डोंगरे कॉम्प्लेक्ससमोर शंकर भोंग, स्वप्निल भोंग, शक्ती बारवकर, स्वप्निल बारवकर, अमोल भोंग, आशितोष भोंग यांनी रात्री झालेल्या भांडणावरून फिर्यादीसह त्यांचे मित्र जय कुदळे व दिनेश शेंडे यांना हाताने लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली.

तसेच शंकर भोंग याने चाकूने फिर्यादीच्या डाव्या हाताचे अंगठ्याजवळील बोटावर मारहाण करून दुखापत करीत डाव्या हाताच्या बोटातील १ तोळ्याची सोन्याची अंगठी जबरदस्तीने काढून घेतली. तसेच दिनेश शेंडे यांना चाकू मारून किरकोळ दुखापत केली. यावरून शंकर भोंग, स्वप्निल भोंग, शक्ती बारवकर, स्वप्निल बारवकर, अमोल भोंग, आशुतोष भोंग (सर्व रा.निमगाव केतकी) यांच्या विरोधात इंदापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास इंदापूर पोलिस करीत आहेत.

पुलावरून कंटनेर कोसळून चालकाचा मृत्यू

भिगवण, : मदनवाडी चौफुला (ता.इंदापूर) येथे शनिवारी (ता.१५) सकाळी सहाच्या सुमारास चालकाचा ताबा सुटला. यामुळे कंटेनर पुलावरून वीस ते पंचवीस फूट खाली कोसळला. यामुळे झालेल्या अपघातामध्ये कंटेनर चालक श्रवणकुमार भगवतीप्रसाद यादव (वय ३७, रा. हल्ली मुंबई, मुळ उत्तरप्रदेश) याचा जागीच मृत्यू झाला.

पोलिसांनी दिलेली माहिती नुसार, मदनवाडी चौफुला येथे सकाळी सहाच्या सुमारास सोलापूर बाजूकडून पुण्याच्या दिशेने निघालेल्या कंटेनर येथील पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या उड्डाणपुलावरून चालकाचे नियंत्रण सुटले व तो रस्त्यावर कोसळला. अपघातांमध्ये चालक यादव गंभीर जखमी झाला होता. त्यास येथील खासगी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. कंटेनर कोसळलेल्या ठिकाणी नेहमी लोकांची वर्दळ असते. अपघात सकाळच्या वेळी झाल्यामुळे त्या ठिकाणी कोणीही व्यक्ती नसल्यामुळे मोठा अनर्थ टळला.दरम्यान, अपघाताचे स्वरूप विचारात घेऊ मदनवाडी चौफुला व भिगवण बस स्थानकाजवळील उड्डाणपुलावर योग्य ती सुरक्षा व्यवस्था करावी, अशा मागणी स्थानिक नागरिकांमधून होत आहे. अपघाताबाबतचा अधिक तपास येथील भिगवण पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद महांगडे यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

धर्मादाय रूग्णालयात उपचाराचे दर समान असावेत; मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी

पुणे । प्रतिनिधी

आर्थिक दुर्बल घटकांमधील नागरिकांवर शासनाच्या आरोग्य योजना तसेच धमार्दाय आयुक्तांकडे नोंदणी असलेल्या रूग्णालयांमध्ये केले जाणारे उपचार तसेच शस्त्रक्रीयांचे दर वेगवेगळे आहेत. त्यामुळे रूग्णांची आर्थिक कोंडी होते तसेच उपचारात अडथळे येतात. ही बाब लक्षात घेवून सर्व धर्मादाय रूग्णालयांमध्ये उपचाराचे दर एकसमान ठेवण्याची मागणी कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुनिल कांबळे आणि विधी व न्याय विभागाच्या राज्यस्तरीय विशेष मदत कक्षाचे सदस्य सिध्दार्थ गिरमे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. तसेच, शासकीय आरोग्य योजनांबाबत

नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी विशेष शिबिरे घेण्याची मागणीही या पत्रात करण्यात आली आहे.

गिरमे यांनी दिलेल्या पत्रानुसार, गेल्या काही वर्षात मधुमेह तसेच कॅन्सरसह दुर्धर आजाराचे रूग्ण वाढत आहेत. त्यामुळे अशा आजारांवरील जीएसटी रद्द केल्यास रूग्णांना फायदा होईल. तशाच प्रकारे हांडाच्या शस्त्रक्रीयांमध्ये लागणारे साहित्य तसेच हृदयाच्या शस्त्रक्रियेमध्ये स्ट्रेन अथवा व्हॉल्व्ह यावर लागणारा जीएसटी कमी केल्यास रूग्णांना हे साहित्य कमी किमतीत मिळेल.

या शिवाय, आयुष्यमान भारत योजनेमध्ये१४०० पेक्षा अधिकहून आजार समाविष्ट असले तरी या बाबत जनजागृतीच नसल्याने नागरिकांना या योजनेचा लाभ घेता येत नाही. तसेच या योजनेत हृदयावरील शस्त्रक्रिया मोफत असतानाही अनेक रूग्णालये त्यासाठी वाढीव शुल्क आकारत असून त्यांच्यावरही नियंत्रण आणण्याची मागणी केली आहे. त्या सोबतच अॅन्जीओग्राफीच्या दरांमध्ये कॅन्सरची स्टेज चेक करण्यासाठी करण्यात येणारे पेट स्कॅन झाल्यास अथवा महात्मा फुले जन आरोग्य योजनेत त्याचा समावेश केल्यास गरिब रूग्णांना फायद होणार असल्याने या बाबत तत्काळ निर्णय घेण्याची मागणीही केली आहे.

पुणे पोलिसांच्या सर्जिकल स्ट्राईकमुळे नगर रोडने घेतला मोकळा श्वास

पुणे । प्रतिनिधी

पुणे-नगर रोडवरील खराडी ते वाघोलीपर्यंत वाहतूक कोंडी मुक्तीसाठी केलेल्या सर्जिकल स्ट्राईकमुळे नगर रोडने मोकळा श्वास घेतला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत फेब्रु व मार्च महिन्यातील कॉरीडोर मधला वेग हा १६ ते १९ टक्क्याने वाढला असून वाहतूक शाखेकडुन केलेल्या सुधारणा व कारवाईमुळे परिस्थिती बदलत आहे.

पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी घेतलेल्या पुढाकारातुन नगर रोडवरील येरवडा, विमानतळ, खराडी, वाघोली परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आयुक्तांसह पुणे शहर परिसरातील लोकप्रतिनिधी, यांनी समस्यांची प्रत्यक्ष पाहणी केली होती आणि योग्य त्या उपाययोजना वाहतुक शाखेकडून करण्याबाबत सुचना केल्या होत्या.

रंजनकुमार शर्मा, (सह पोलीस आयुक्त, पुणे शहर), मनोज पाटील, (अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर) यांचे मार्गदर्शनाखाली वाहतुक शाखेकडून नगर रस्त्यावरील वाहतुक समस्यांचा अभ्यास करुन, वाहतुक कोंडी कमी करुन वाहतुकीचा वेग वाढविण्यासाठी प्रायोगिक तत्वावर सिग्नल फेज बदल, चौक सुधारणा, काही राईट टर्न व यु टर्न बदल करण्यात आले आहेत.

होळीच्या दिवशीच गुंडांची धिंड!

पुणे :- २० ते २५ वयोगटातील सराईत गुन्हेगारांकडून परिसरातील सामाजिक स्वास्थ्य बिघडवत दहशत माजविण्याच्या दृष्टीने गुन्हे केले जात होते. गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसविण्याच्या दृष्टीने कात्रज, संतोषनगर, सच्चाईमाता चौक, भगवा चौक, हनुमाननगर, शनिनगर, जांभूळवाडी रोड, पाण्याची टाकी चौक परिसरातून मुख्य रस्त्याने पायी धिंड काढण्यात आली.

या वेळी सहायक पोलिस आयुक्त राहुल आवारे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक शरद झिने, सहायक पोलिस निरीक्षक भोजलिंग दोडमिसे, प्रियंका गोरे, पोलिस उपनिरीक्षक मोहन कळमकर, रातीकांत कोळी, सुरेश शिंदे, लक्ष्मण डोईफोडे आदींसह आंबेगाव पोलिस स्टेशनचे कर्मचारी उपस्थित होते. या कारवाईने कात्रज संतोषनगर, आंबेगाव परिसरातील गुन्हेगारांना चांगलाच वचक बसला असून, पोलिसांच्या धडक कारवाईबाबत समाधान व्यक्त केले जात आहे.

'ते' एक प्रतीक म्हणून औरंगजेबाच्या कबरीला हात न लावणे योग्य ठरेल; रोहित पवारांची स्पष्ट भूमिका

पुणे । प्रतिनिधी

औरंगजेबाच्या कबरीवरून सध्या राजकारण चांगलच तापलंय .मागील काही दिवसांपासून वेगवेगळ्या संघटनांकडून औरंगजेबाची कबर उखडून टाका असे मागणी वारंवार केली जात आहे .दरम्यान,विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने औरंगजेबाची कबर पाडा अन्यथा बाबरी मशिदीची पुनरावृत्ती करू असा इशाराच दिल्याने आक्रमक वातावरण आहे .या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरच्या औरंगजेब कबर परिसरात पोलिसांचा बंदोबस्त ही वाढवण्यात आलाय .यावरून आमदार रोहित पवारांनी प्रतिक्रिया दिलीये .२७ वर्षे औरंगजेबाला इथे राहून राज्यकर्ता आले नाही याचा प्रतीक म्हणजे ही औरंगजेबाची कबर आहे .हिकबर आज काढून टाकली तर भविष्यात लोक गडबड करतील .त्यामुळे एक प्रतीक म्हणून या कबरीला हात न लावणे योग्य ठरेल .असे रोहित पवार म्हणाले आहेत .

काय म्हणाले रोहित पवार ?

औरंगजेबाच्या कबरीवरून सध्या राजकारण चांगलंच तापले आहे . अनेकांनी ही कबर उखडून टाकण्याची मागणी केली असून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी औरंगजेबाची कबर आज काढून टाकली तर भविष्यात लोक गडबड करतील .२७ वर्षे औरंगजेबाला येथे राहून राज्य करता आले नाही त्याचे प्रतीक म्हणजे औरंगजेबाची कबर आहे .त्यामुळे एक प्रतीक म्हणून त्या कबरीला हात न लावण्याचे योग्य ठरेल असे रोहित पवार म्हणाले. छावा चित्रपटात क्रूर राज्यकर्ता म्हणून दाखवण्यात आल्यानंतर समाजवादी पार्टीचे आमदार अबू आजमी यांनी औरंगजेबाला उत्तम प्रशासक म्हणत गवगवा केला . त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यानंतर त्यांच्यावर निलंबनाची कारवाईही झाली . दरम्यान औरंगजेबाची कबर काढून टाकावी या मागणीचा जोर वाढला आहे.

विद्युत मोटार केबल चोरट्यांची टोळी जेरबंद

ओतूर । प्रतिनिधी

गत काही महिन्यात ओतूर आणि आजूबाजूच्या गावातील शेतकर्यांच्या शेतजमिनीतील विहिरींवरील विद्युत मोटारला जोडलेली महागड्या केबल चोरी करणार्या सहा जणाच्या टोळीला ओतूर पोलिसांनी जेरबंद केले. या आरोपींकडून एकूण १ लाख १४ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक लहू थाटे यांनी दिली.

केशव बबन काळे (रा. कुरकुंडी, ता. संगमनेर, जि. नगर), किशोर सुरेश काळे (रा. भोजदरी, संगमनेर, जि. नगर), राहुल विठ्ठल काळे (रा. भोजदरी, ता. संगमनेर, जि. नगर व दीपक तात्याबा डोके (रा. सावरचोळ, ता. संगमनेर, जि. नगर) अशी अटक चोरट्यांची नावे आहेत.

तसेच या चोरट्यांकडून चोरीच्या विद्युत मोटारी व केबल विकत घेणार्या भंगार व्यावसायिक सोबरन राजाराम चौहान (रा. घारगाव, ता. संगमनेर, जि. नगर, मूळ रा. मध्यप्रदेश) व मेटल खरेदी व्यावसायिक विक्रम मसिंग अमरसिंग राठोड (रा. आळेफाटा, मूळ रा. राजस्थान) यांनाही अटक करण्यात आली.

हद्दीतील शेतकर्यांच्या शेतातील विहिरीमधील विद्युत मोटारीचे केबल चोरीच्या गुन्ह्यांचा तपास चालू असताना पोस्को कायद्यांतर्गत अटक आरोपी सराईत गुन्हेगाराकडे कसून चौकशी तसेच त्याच्या मोबाईलचा तांत्रिक तपास करता त्याने साथीदारांच्या मदतीने ओतूर, रोहकडी, खामुंडी परिसरातील शेतकर्यांच्या विहिरींमधील विद्युत मोटारींच्या केबल चोरी केल्याचे सांगितले.

तसेच ओतूर पोलिस ठाण्यात विहिरीतील मोटार केबल चोरीचे ४ गुन्हे उघडकीस आले आहेत. या आरोपींकडून पोलिसांनी १८ किलो वजनाच्या धातुच्या तारा, ५ हजार रुपये किंमतीच्या विद्युत मोटारीची काळी केबल, १०० रुपयांचे एक कटर, तसेच गुन्हा करताना वापरलेल्या दोन दुचाकी व एकूण १ लाख १४ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अटक आरोपींना जुन्नर न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावली आहे. आरोपींनी ओतूर व जुन्नर पोलिस ठाणे हद्दीत गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. पोलिस हवालदार बाळशीराम भवारी, नदीम तडवी हे अधिक तपास करीत आहेत.

इंद्रायणी नदीचे पाणी पिण्यास मनाई खुद्द जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केले मनाईचे आदेश

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात नुकताच गुलेन बॅरे सिन्ड्रोमने पुणेकरांच्या तोंडचे पाणी पळवले होते. दूषित पाणी हे या आजाराचे मुख्य कारण असल्याचे समोर आले होते. याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी इंद्रायणी नदीचे पाणी पिण्यास मनाई करणारा आदेश जारी केला आहे. श्री क्षेत्र देहू येथे १४ ते १६ मार्च २०२५ या दोन तुकाराम बीज सोहळा पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश दिल्याचे समजते.

श्री क्षेत्र देहू येथील इंद्रायणी नदीच्या दोन्ही तीरावरील पाणी पिण्याकरीता व स्वयंपाकाकरीता उपयोगात आणण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे. तथापि, ते पाणी भांडी घासणे वा तत्सम अन्य कारणासाठी वापरता येईल. तसेच देहूतील ठिकठिकाणी असलेल्या सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या नळाचे पाणी पिण्यासाठी वापरावे.

इंद्रायणी नदीच्या पात्रात कोणतेही कपडे धुवू नयेत, अगर कोणत्याही प्रकारे नदीचे पाणी दूषित होईल असे कृत्य करु नये. सदर दूषित पाणी पिल्याने लोकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम १३१ प्रमाणे कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी श्री. डूडी यांनी आदेश नमूद केले आहे.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे सदेह वैकुंठ गमनाचा सोहळा तुकाराम बीज म्हणून साजरा केला जातो. संत श्रीतुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठगमनाला येत्या १६ मार्च रोजी अर्थात तुकाराम बिजेच्या दिवशी ३७५ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने संत श्रीतुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अर्थात तुकाराम बीज सोहळा साजरा होत आहे.

धूलिवंदनाच्या दिवशी ४०० मद्यपींवर कारवाई; ३८६ वाहने जप्त; ५० लाखांचा दंड

पुणे । प्रतिनिधी

धूलिवंदनाच्या दिवशी मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या ४०० चालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी सहा हजार ११८ वाहनचालकांविरुद्ध कारवाई करून ५० लाख ९४ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तर वाहतुकीच्या नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करत ३८६ वाहने जप्त करण्यात आली आहेत.

पोलिसांनी वेगवेगळ्या भागात नाकाबंदी करून वाहनचालकांची तपासणी केली. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली. मद्यपान करून वाहने चालविल्याने गंभीर स्वरूपाचे अपघात झाल्याचे अनेक प्रकार शहरात घडले आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात नाकाबंदी करून मद्यपी वाहनचालकांची तपासणी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार गुरुवारी (ता. १३) मध्यरात्रीपासून शहराच्या वेगवेगळ्या भागात, तसेच प्रमुख रस्त्यांवर लोखंडी कठडे उभे करून नाकाबंदी मोहीम राबविण्यात आली. शुक्रवारी मध्यरात्रीपर्यंत विशेष मोहीम राबविण्यात आली, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिली.

पोलिसांनी ९० ठिकाणी नाकाबंदी करून आठ हजार ५५२ वाहनचालकांची तपासणी केली. ब्रीथ नालायझर यंत्राद्वारे मद्यपी वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. तपासणीत ४०२ वाहनचालकांनी मद्य पिऊन वाहने चालविल्याचे उघड झाले. त्यांच्यावर खटला दाखल करण्यात आला आहे. शहरातील ३७ वाहतूक विभागातील पोलिस कर्मचारी नाकाबंदी कारवाईत सहभागी झाले होते.

सासवड येथे रविवारी शासकीय योजनांचा व सेवांचा महामेळावा

बारामती । प्रतिनिधी

राष्ट्रीय विधीसेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय मुंबई, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पुणे व तालुका विधी सेवा समिती सासवड यांचे संयुक्त विद्यमाने रविवार (१६ मार्च २०२५) रोजी वाघीरे महाविद्यालय, सासवड येथे शासकीय योजनांचा व सेवांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर व भोर इत्यादी तालुक्यातील लाभार्थ्यांकरिता हा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय श्रीनिवास ओक यांचे हस्ते या महामेळाव्याचे उद्घाटन होणार असून मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे, न्यायमूर्ती संदीप वि मारणे, न्यायमूर्ती आरिफ सा. डॉक्टर इत्यादी मान्यवर या महामेळाव्यात मार्गदर्शन करणार असून पुणे जिल्हा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन यांचे अध्यक्षतेखाली हा महामेळावा पार पडणार आहे.

या मेळाव्याला जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी मान्यवर हजर राहणार आहेत. सकाळी साडेदहा वाजता हा महामेळावा सुरू होईल. बारामती, दौंड, इंदापूर, पुरंदर व भोर तालुक्यातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन बारामती जिल्हा न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश तथा विधी सेवा समिती अध्यक्ष व्ही.सी.

लोणी काळभोर भागात 'अफु'ची लागवड; पोलिसांचा छापा, महिला गजाआड

पुणे । प्रतिनिधी

लोणी काळभोर भागातील म्हातोबाची आळंदी गावात एका शेतात अफुची लागवड करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. लोणी काळभोर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. याप्रकरणी एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करुन तिला अटक करण्यात आली.

याप्रकरणी मंगल दादासाहेब जावळकर (वय ४५, रा. म्हातोबाची आळंदी, लोणी काळभोर, ता. हवेली) या महिलेला अटक करण्यात आली. तिच्याविरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी दिली आहे. पुणे-सोलापूर रस्त्यावर म्हातोबाची आळंदी गाव आहे. जगताप मळा रस्त्यावर मंगल जावळकर हिची जागा आहे. या जागेत अफुची लागवड करण्यात आली होती. तेथे अफुची ६६ झाडे लावण्यात आल्याची माहिती खबऱ्याने लोणी काळभोर पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने पंचासमक्ष तेथे छापा टाकून कारवाई केली. पोलिसांनी केलेल्या पाहणीत तेथे अफुची ६६ झाडे लावण्यात आल्याचे उघडकीस आले. त्यानंतर जमीन मालक जावळकर हिला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला. परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक आयुक्त अनुराधा उदमले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, उपनिरीक्षक अनिल जाधव, हवालदार क्षीरसागर, वणवे, कटके, कुदळे, नानापुरे, तेलंगे यांनी ही कारवाई केली.